

# दर्पण

संगणक क्षेत्रातील खणखणीत नाणं,
जे घडवील मातीतूनही सोनं....



## दर्पण एज्युकेशन सोसायटी

करीअर मंत्र २०१२

### शाखा विस्तार

- दर्पण कॉम्प्युटर, कोरेगांव से.को.१३२१००८४
- दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर से.को.१३२१०२०७
- दर्पण बी.सी.ए. कॉलेज, कोरेगांव से.को.६४८५A
- दर्पण टाईपराईटींग इन्स्टिट्यूट. कोरेगांव

# क्षण प्रगतीचे....

## गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा २०११



आमदार शशिकांत शिंदे यांचे स्वागत करताना संस्थापक, अध्यक्ष एस. आर. नलवडे सोबत सभापती संजय झंवर



कार्यक्रमप्रसंगी मनोगत व्यक्त करताना आमदार शशिकांत शिंदे सोबत मान्यवर.



प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त करताना संस्थेचे संस्थापक एस. आर. नलवडे सोबत मान्यवर.



सभापती संजय झंवर यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करताना श्री. कुलकर्णी सर



उपसभापती भास्करराव कदम यांचा सत्कार करताना श्री. कुलकर्णी सर



उपसभापती भास्करराव कदम यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना उपाध्यक्ष संदीप नलवडे



संस्थेची गुणवंत विद्यार्थीनी उज्वला शिर्के हिचा सत्कार करताना आमदार शशिकांत शिंदे.



संस्थेची गुणवंत विद्यार्थीनी दिपाली वाघ हिचा सत्कार करताना आमदार शशिकांत शिंदे.



संस्थेची गुणवंत विद्यार्थीनी प्रियांका घाडगे हिचा सत्कार करताना आमदार शशिकांत शिंदे.



संस्थेची गुणवंत विद्यार्थीनी सोनम गायकवाड हिचा सत्कार करताना आमदार शशिकांत शिंदे.



संस्थेची गुणवंत विद्यार्थीनी कोमल जाधव हिचा सत्कार करताना आमदार शशिकांत शिंदे.



गुणवंत विद्यार्थी सुरज खाडे याचा सत्कार करताना कोरेगांव पंचायत समितीचे सभापती संजय झंवर

# 'दर्पण' दिशा नव्या युगाची !



प्रिय विद्यार्थी, वाचक मित्रहो....
सप्रेम नमस्कार !

एकवीसाव्या शतकाची ओळख, माहिती, तंत्रज्ञान युग म्हणून केली जात आहे. संगणक आणि इंटरनेट ही या युगाची गतिमान माध्यमे ठरली आहेत. ज्ञान, माहिती, व्यापार, उद्योग, कार्यपध्दती, मनोरंजन, संपर्क अशा सर्वच क्षेत्रांच्या कक्षा या माध्यमांमुळे विस्तारल्या आहेत. या संगणक क्रांतीमुळेच माणसाच्या जीवनात मोठा अमुलाग्र बदल झाला आहे, जगाच्या पाठिवर कोणत्याही क्षेत्रात उतरण्यास तो त्यामुळे सज्ज झाला आहे. ज्ञानधिष्ठीत समाजव्यवस्थेची आव्हाने पेलून स्वत:ची उन्नती साधण्यासाठी आता माहिती-तंत्रज्ञानाची साक्षरताच अपरिहार्य असल्याचे यानिमित्ताने सिध्द झाले आहे.

गतिमान युगाची गरज ओळखूनच कोरेगांव तालुक्याच्या शिक्षण क्षेत्रात दर्पण एज्युकेशन सोसायटी, कोरेगांव या संस्थेची स्थापना ४ जानेवारी २००६ रोजी करण्यात येवून या संस्थेच्या 'दर्पण कॉम्प्युटर' या इन्स्टिट्यूटची उभारणी करण्यात आली. ज्यामुळे कोरेगांव तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांना संगणक साक्षर होण्याची संधी मिळाली. या संस्थेच्या निर्मितीमुळे कोरेगांव तालुक्याच्या ग्रामीण भागातील गरीब, गरजू व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अल्पदरात अत्याधुनिक संगणक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. या इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून MS-CIT, TALLY, DTP, BCA या सारखे दर्जेदार कोर्सेस विद्यार्थ्यांना देवून एक सक्षम, शिक्षीत युवा पिढी समाजाला बहाल केली. या इन्स्टिट्यूने मिळविलेल्या भरघोस प्रतिसादानंतर संगणक क्षेत्रातील नव्या अभ्यासक्रमाच्या बी.सी.ए. कॉलेजसाठी दर्पण एज्युकेशनला मान्यता मिळाली. दर्पण बी.सी.ए. कॉलेजचा प्रारंभ २००८ साली झाल्यानंतर बघता बघता या ही कॉलेजला विद्यार्थ्यांनी भरपूर प्रतिसाद दिला. तालुक्याचा वाढता विस्तार व विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेवून पुढे दर्पण कॉम्प्युटरची दुसरी शाखा रहिमतपूर शहरात २०१० साली सुरू करण्यात आली. ही शाखा सुध्दा अल्पावधीतच विद्यार्थ्यांनी आपलीसी केली. दर्पण इन्स्टिट्यूटच्या या घवघवीत यशामुळे तालुक्यातील हजारो विद्यार्थी IT क्षेत्रात चमकू लागले आहेत. भविष्याचा वेध घेवून दर्पण इन्स्टिट्यूटने वेळोवेळी केलेला बदल, अभ्यासक्रमातील आधुनिकता यालाच या यशाचे श्रेय द्यावे लागेल.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या रुपाने महाराष्ट्र शासन अत्यंत उपयुक्त अशी संगणक साक्षरता मोहिम राबवत आहे. गेल्या दहा वर्षात ५० लाखाहून अधिक विद्यार्थी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचा (MKCL) महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (MS-CIT) हा कोर्स केला आहे. गावोगावी संगणक पोहोचवून सामाजिक स्तरावर बदल घडविण्यास महाराष्ट्र ज्ञान मंडळ यशस्वी झाले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक दहावी आणि बारावी झालेल्या विद्यार्थ्यांच्या मनात सुट्टीत काय करायचे? हा निर्णय पक्का झाला. लाखोंच्या घरात गेलेल्या या विद्यार्थ्यांना MS-CIT करताना त्यांच्या आयुष्याची दिशा निश्चित करता आली. हे विद्यार्थी ज्ञान युगात इंटरनेटद्वारे जोडले गेले. दर्पण एज्युकेशन सोसायटीनेही नेमक्या याच उद्देशाने कोरेगांव तालुक्यातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्याचा ध्यास घेतला. आज हे इन्स्टिट्यूट तालुक्यातील नवतरुणांना दिशा देणारे एक सक्षम ज्ञान केंद्र बनले आहे.

दर्पणच्या यशाचा आलेख मांडणारं 'करीअर मंत्र' २०१२ हे मुखपत्र विद्यार्थ्यांना देताना आनंद होत आहे. या माहिती पत्रीकेतून संगणक शिक्षणाची दिशा देणारे विचार यात मांडले आहेत. दहावी, बारावी नंतर काय करावे या प्रश्नाला समर्पक उत्तर या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणार आहे. स्पर्धेच्या युगात संगणक ज्ञान हेच आता सर्वांना तारक ठरणार असून त्या दिशेने सर्वांची वाटचाल होत राहो याच यानिमित्ताने सदिच्छा व्यक्त करतो.

**- संतोष रामचंद्र नलवडे,**
संस्थापक, दर्पण एज्युकेशन सोसायटी, कोरेगांव.

# दर्पणचा 'ट्रॅडिशनल डे'



उपसरपंच जयवंत पवार यांच्या हस्ते पारितोषीक स्विकारताना विद्यार्थी सोबत आमदार शशिकांत शिंदे




LLC कॉर्डीनेटर श्री. दामोदर सर यांचा सत्कार करताना संस्थेचे संस्थापक एस. आर. नलवडे



संस्थेच्या संचालीका सौ. कांचन नलवडे यांचे स्वागत करताना चव्हाण मॅडम.



देशभक्तीपर गाण्यावर नृत्य सादर करताना विद्यार्थीनी.



दर्पणच्या रविना भोसले हीने एक बहारदार नृत्य सादर केले.




लावणी नृत्यात सहभागी कलाकार



लावणी नृत्य सादर करताना पुजा पवार




कोळी नृत्य सादर करताना साक्षी पवार



समूह नृत्य सादर करताना संस्थेचे विद्यार्थी



'ट्रॅडिशनल डे' मध्ये नृत्य करताना अर्चना जाधव



गुणगौरव सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी शोभराज भिलारे.



विद्यार्थी गुण गौरव सोहळ्यास उपस्थित असलेले विद्यार्थी

|| सरकारमान्य ||
दर्पण कॉम्प्युटर्स

**कोरेगांव शाखा** Center Code-13210084
डी.पी.भोसले कॉलेज समोर, कोरेगाव
मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२२१९३९

**रहिमतपूर शाखा** Center Code-13210207
दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर प्रभात टॉकीज शेजारी,
कोरे हाईटस् मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२३०४३०

# अभ्यास करण्याचे तंत्र

विद्यार्थीदशेत आपण सगळेजण अभ्यास करतो. कुणी रोज दोन तास तर कुणी चार तास! पुस्तक वाचणे, शाळेत शिकणे, होमवर्क इ. साठी आपण काहीतरी तास अभ्यासात. पण तरीही परीक्षेत अपेक्षीत यश मिळत नाही. असे का होते? आपण अनेकदा असे पाहतो की काही विद्यार्थी खूप कमी वेळ अभ्यास करून जास्त गुण मिळवतात तर काही भरपूर वेळ अभ्यास करुनही यशस्वी होत नाहीत. यासाठी गरज आहे ती अभ्यास तंत्राची - कमीत कमी वेळ घालवून जास्तीत जास्त अभ्यास करण्याचे तंत्र म्हणजे-अभ्यासतंत्र. हे तंत्र अवलंबले तर अभ्यासाव्यतिरिक्त खूप वेळ मिळतो. त्यामुळे अभ्यासाबरोबर अनेक गोष्टी करणे शक्य होते. अभ्यासाच्या तंत्राचा विचार करताना आपल्याला आकलनाचा विचार करावा लागतो. आपण कसे शिकतो? आपण मेंदुने शिकतो. शिकणे हे मेंदुचे कार्य आहे. मेंदु हे ज्ञानप्राप्तीचे कार्य कसे करतो? आपल्या पंचेंद्रियांच्या मार्फत मेंदु ज्ञान मिळवतो. ही पंचेंद्रिये म्हणजे - डोळे, नाक, स्पर्श, कान, जीभ - डोळ्यांनी आपण पाहतो, नाकाने श्वास घेतो, स्पर्शानेही आपल्याला ज्ञान होते, कानाने ऐकतो तर जीभेने चवीची जाणीव होते, या पाच इंद्रियांच्या सहाय्याने आपण दर सेकंदाला / दर श्वासाला ज्ञान मिळवीत असतो. ते आपल्या मेंदुत साठवित असतो. आपल्याला जे पटते ते आपल्या अंतर्मनात साठविले जाते. जितक्या एकाग्रतेने हा अनुभव प्रत्येकत विद्यार्थी करतो, तितक्याच तीव्रतेने ते त्याच्या लक्षात राहते. याचा अर्थत कोणतीही गोष्ट एकाग्रतेने करणे महत्त्वाचे आहे.

अभ्यास तंत्राचा विचार शास्त्रज्ञांनी प्रामुख्याने चार विभागात केला आहे.

१) शारीरिक तंदुरुस्ती
२) अभ्यासाची कौशल्ये
३) अभ्यासाच्या सवयी
४) मानसिकता

कोणताही अभ्यास करायचा तर शारिरिक तंदुरुस्ती सगळ्यात महत्त्वाची आहे. तुम्ही सतत आजारी असलात, सतत सर्दी खोकला, ताप किंवा अशक्त असल्यास अभ्यास होऊ शकणार नाही. त्यासाठी शरीर भक्कम असणे गरजेचे आहे.

शारीरिक तंदुरुस्ती आणखी एका कारणासाठी महत्त्वाची असते. आपण अभ्यास मेंदुने करतो. त्यामुळे मेंदुला ताजेतवाने ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी मेंदुचा व्यायाम कसा कराल? आपल्या मेंदुला ऑक्सिजनचा पुरवठा मुबलक प्रमाणात व्हावा लागतो. तो नसेल तर मेंदू थकतो. मेंदुला ऑक्सिजनचा पुरवठा रक्ताभिसरणामुळे होतो, जे व्यायामाने वाढते, याचा अर्थ असा की अभ्यास चांगला व्हायचा असेल तर दररोज किमान एक तास खेळले पाहिजे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा अभ्यासाची कौशल्ये -

आपण अभ्यास कसा करतो? आपण शाळेत जातो, लेक्चर ऐकतो, नोटस् काढतो. व परीक्षेत लिहितो म्हणजे आपण विषय समजून घेण्यासाठी ऐकणे व वाचणे या क्रिया प्रामुख्याने करतो. ऐकणे व वाचणे ही कौशल्ये ज्ञानार्जनासाठी वापरतो. आपल्या मेंदुत मिळालेल्या ज्ञानाची ही प्रक्रिया असते. ज्याला इनपुट डिव्हाईस म्हणतात व विषय किती समजला याची परीक्षा आपण बोलणे व लिहणे या आऊटपुट डिव्हाईस चा वापर करुन करतो.

पुढचा महत्त्वाचा भाग आहे वाचन. जगामध्ये जे विद्वान आहेत त्यांचा वाचनाचा वेग प्रचंड होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद यांच्या एकाग्रतेने वाचण्याच्या गोष्टी सांगितल्या जातात. दहावीच्या विद्याथर्यांसाठी एका मिनिटाला वाचनाचा वेग ३५० शब्द आवश्यक आहे. नुसते वाचणे महत्त्वाचे नाही. समजून वाचणे महत्त्वाचे आहे.

ही गोष्ट लेखनासंदर्भात आहे. दहावीतल्या सरासरी सर्वसामान्य लेखनाचा वेग मिनिटाला ५० शब्द आवश्यक आहे. हा वेग घड्याळ लावून मोजता येईल व सरावाने वाढवित येईल. याबरोबरच निरीक्षण कौशल्य महत्त्वाचे आहे. आपण निरीक्षणातून शिकतो. विशेषत: विज्ञान व गणिताचे नियम तर संबंधाच्या निरीक्षणावर अवलंबून असतात.

ही सर्व कौशल्ये संपादन करण्यासाठी आवश्यक असतो सराव. नियमित सरावाने ही तंत्रे अवलंबता येतील. या सर्वांबरेबर आणखी एक महत्वाचा विषय म्हणजे आपली मानसिकता. आपलं मन म्हणजेच मेंदुचे कार्य कसे चालते हे महत्त्वाचे आहे. अभ्यास करताना अनेक मानसिक समस्या अवतीभवती असतात. मुले हुशार असतात पण त्यांना अभ्यासाचा कंटाळा असतो. घरात पालकांची भांडणे, शाळेत शिक्षकांचे रागवणे, मुला-मुलांमधील भांडणे, या सर्व गोष्टींचे दडपण येते. याच वेळेस विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक बदल होत असतात. अनेक भावना निर्माण होत असतात. कधी प्रेमाच्या, कधी मत्सरांच्या कधी कुणाबद्दल ईर्षा असते. चित्रपट, टी.व्ही.इ. आकर्षण अभ्यासापासून मन विचलित करतात. यासाठी थोडी ध्यान धारणा करून मनावर संयम मिळविणे आवश्यक आहे. भावी आयुष्यात काय बनायचे ही दिशा ठरविणेही गरजेचे आहे. त्यानुसार आपली अभिनव अभयास पद्धती अवलंबून अपेक्षित यश प्राप्त होईल तसेच पुढील शिक्षणात निश्चितपणे यशस्वी होता होईल.

|| सरकारमान्य ||

# दर्पण कॉम्प्युटर्स

**कोरेगांव शाखा** Center Code-13210084
डी.पी.भोसले कॉलेज समोर, कोरेगाव
मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२२१९३९

**रहिमतपूर शाखा** Center Code-13210207
दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर प्रभात टॉकीज शेजारी,
कोरे हाईटस् मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२३०४३०

# उत्तरपत्रिका लेखनाचे तंत्र

विद्यार्थी मित्रांनो,

इ. १०वीचा पेपर तपासला जात असताना परीक्षकांसमोर तुम्ही पेपरच्या रूपाने असता. त्यामुळे तुम्ही जर नीटनेटका, स्वच्छ, व्यवस्थित आणि अभ्यासपूर्ण पेपर लिहिला असेल तर तुम्हाला परीक्षकांकडून भरपूर गुण मिळू शकतात. पण असा हा पेपर लिहिण्याकरिता खालील काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

१. अक्षर सुवाच्च, स्वच्छ आणि सुस्पष्ट असावे. खाडाखोड किंवा शाईचे डाग नसावेत.

२. अक्षर फार मोठे, बारीक, तिरके काढू नये.

३. प्रश्नक्रमांक किंवा उपप्रश्नांचे क्रमांक व्यवस्थितपणे घालून ते एकाच ठिकाणी सोडविलेले असावेत.

४. प्रश्नांची उत्तरे जितक्या शब्दात विचारली आहेत तेवढीच आणि अचूक व मुद्देसूद लिहा. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर लिहिताना समासानंतर थोडी जागा सोडून लिहावे. आवश्यक तेथे परिच्छेद पाडावे.

५. कोणतीही उत्तरपत्रिका लिहिताना प्रश्नपत्रिका वाचण्यात जास्त वेळ घालवू नका. वाचन आणि लेखनाचा वेग याकडे लक्ष ठेवा.

६. उत्तरपत्रिकेत प्रश्न न उतरविता केवळ उत्तर लिहा.

७. उत्तरपत्रिका लिहिताना एकूण प्रश्न आणि त्यासाठीचा वेळ याची अशी विभागणी करा की शेवटची १० मिनिटे तुमच्याकडे तुम्ही लिहिलेहली उत्तरपत्रिका पूर्णपणे वाचून आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी राहतील.

८. भाषा विषयात शुद्धलेखनाच्या चुका टाळाव्यात.

९. महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करावेत.

१०. सर्व भाषांमधील कवितांच्या ओळी, लघुत्तरी किंवा दिर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहिताना वापरल्यास, नेहमीपेक्षा जास्त गुण मिळू शकतात. तेव्हा त्यांचा जरुर वापर करावा.

११. निबंधात सुरुवातीला मुद्दे लिहावेत.

१२. आत्मवृत्तपर निबंध लिहिताना प्रथम पुरुषी वाक्यरचना करावी. तृतीय पुरुषी वाक्यरचनेत निबंध लिहू नये.

१३. पत्र लेखनाचा विषय समजून घ्या. विषय बदलून तुमचे स्वत:चे पत्र लिहू नका.

१४. पत्रलेखनाचा आरंभ शक्यतो डाव्या नवीन पानावर करा. म्हणजे पत्र वाचताना डाव्या व उजव्या पानावर सलगता राहील.

१५. पत्रात वरच्या बाजूस उजव्या कोपऱ्यात पत्रलेखकाचे नाव व पत्ता(घरक्रमांक, ठिकाण, पेठ, गाव याक्रमाने) लिहावा. प्रश्नपत्रिकेत नाव-पत्ता दिले असल्यास तेच लिहावे. अन्यथा अ ब क असे नाव लिहून काल्पनिक पत्ता लिहावा. स्वत:चे नाव व सही नको. पत्त्याच्या खालच्या ओळीवर दिनांक, महिना, वर्ष लिहावे. डाव्या बाजूला मायना लिहावा. व्यावसायिक पत्रात विषय जरुर लिहावा.

१६. भाषांतराच्या प्रश्नात मांडणी, हस्ताक्षर, शुद्धलेखन व योग्य काळाचा वापर याकडे लक्ष द्या. भाषा विषयांच्या उत्तरपत्रिकेत व्याकरण आणि वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरलेखनात ऱ्हस्व-दिर्घाची चूक झाली आणि विशेषत: जो मुख्य शब्द आपण उत्तर म्हणून लिहिला असेल. त्यातच अशी चूक झाल्यास निश्चितपणे मार्क कापले जातात. साधारणपणे एक मार्काचा प्रश्न असल्यास अर्धा मार्क कापला जातो.

१७. याच विषयांच्या दीर्घोत्तरी, लघुत्तरी प्रश्न किंवा पत्र-निबंध अशा स्वरुपांच्या प्रश्नात व्याकरण-शुद्धलेखनाच्या भरपूर चुका आढळल्यास एक ते दोन मार्क कापले जातात. म्हणूनच तुमचे लेखन व्याकरणदृष्ट्या अचूक असायला हवे.

१८. भाषा विषयात शुद्धलेखन आणि व्याकरणाला विशेष महत्त्व असले तरी विज्ञान व इतिहास-भूगोलसारख्या विषयामध्ये व्याकरणाच्या, वाक्यरचनेच्या, चुका करु नयेत. काण या विषयांत व्याकरण, शुद्धलेखन इ. गोष्टींना महत्त्व नसले तरी अशा भरपूर चुका परीक्षकांचे लक्ष वेधून घेऊ शकतात आणि त्याचा परिणाम गुणांवर होतो.

१९. कोणत्याही विषयाची, विशेषत: गणित विषयाची उत्तरपत्रिका सोडविताना भरपूर कच्चे काम करावे लागते. असे काम उत्तरपत्रिकेच्या शेवटच्या पानावर (Rough Work) करावे व संपूर्ण पेपर लिहून झाल्यानंतर त्यावर पेन्सिलने काट मारावी.

२०. वरील सर्व गोष्टींचे पालन व्यवस्थित केल्यास यश तुमच्यापासून दूर नाही हे पक्के लक्षात ठेवा.

# परिक्षेची तयारी

मुलांसाठी आवश्यक सूचना :

* आपला अभ्यास वेळापत्रकावरुन निर्धारित करा. अभ्यास करताना आपल्या सभोवतालचे वातावरण स्वच्छ व नीटनेटके असावे. त्यामुळे अभ्यासात एकाग्रता वाढते.

* मित्रासोबत अभ्यास करताना फक्त परीक्षेसंबंधीची चर्चा करून एक दुसऱ्यास प्रश्नोत्तरे करुन अभ्यासाची उजळणी करा.

* आपला मित्र रात्रभर अभ्यास करतो, म्हणून आपण देखील रात्रभर जागून अभ्यास करु असे समजून आपल्या मर्यादेच्या बाहेर कोणतेही कार्य करु नये. याचा परिणाम मानसिक व शारीरिक स्थितीवर हेऊन ऐन परीक्षेच्या वेळी त्रास निर्माण होऊ शकतो. उत्तम निकालासाठी आरोग्य गरजेचे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

* जास्त वेळ अभ्यास करण्यासाठी चहा, कॉफी जास्त पिणे, धुम्रपान याचा आधार घेऊ नये.

* आपण कशा पद्धतीने अभ्यास करतो, हे आपल्या आई-वडिलांना सांगून याबद्दल चर्चा करा, जेणेकरून त्याच्या मनात निर्माण होणारी भीती कमी होऊ शकेल आणि काही अडचण येत असल्यास आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शन अवश्य घ्यावे.

* आपणास जास्त झोप येत असल्यास जॉगिंग, सायकलिंग करावे अथवा आवडती गाणी ऐकावीत, जेणेकरून अभ्यासामुळे आलेला थकवा दूर होऊन पुन्हा एकाग्रतेने अभ्यास करु शकाल.

* पुस्तकावरुन डोळे फिरवून मनातल्या मनात वाचन करु नये. बरेचदा नजरेसमोर पुस्तक असून देखील डोक्यात इतर विचार येत असतात. मोठ्याने वाचन करावे. जमल्यास वाचन करताना ते टेप करू शकल्यास फायदेशीर ठरते.

* बरेच वेळा सतत अभ्यास करून आलेल्या मानसिक थकव्यामुळे विसरभोळेपणा येतो आणि अभ्यासाबद्दल घृणा निर्माण होते. अशावेळेस आपण डोळे मिटून शांतपणे दीर्घ श्वास घेऊन हळूहळू सोडावा व सोडताना शरीराला शिथिल करावे. अशा वेळेस आपण टेप केलेले वाचण ऐकावे.

* अभ्यास प्रश्नोत्तर संग्रहातून न करता पुस्तकातून करावा.

परीक्षेची पूर्वतयारी

परीक्षेच्या कमीत कमी १५ दिवस अगोदर प्रत्येक विषयाची एक वेळा तरी उजळणी व्हायला हवी. निरनिराळ्या प्रकारच्या प्रश्नपत्रिका सोडवून बघाव्यात. परीक्षेच्या एक आठवडा अगोदर नियमित शिथिलीकरणाचे व्यायाम अवश्य करावेत. डोळे मिटून शांतपणे प्रत्येक विषयातील आपणास कठीण वाटत असलेले टॉपिक्स नजरेसमोर आणून त्याची उजळणी करावी. परीक्षेच्या शेवटच्या क्षणापर्यंत अभ्यास करु नये. त्यामुळे बऱ्याच मुलांमध्ये आत्मविश्वासाची कमी निर्माण होते.

परीक्षेनंतर...

परीक्षा संपली आता स्वत:लाच शाबासकी द्या. आराम करा आणि परीक्षेबद्दल विसरुन जा.

लक्षात ठेवा...

परीक्षा हे सर्वस्व नाही. परीक्षेच्या पलिकडेही बऱ्याच गोष्टीत आहेत. निकाल अपेक्षेप्रमाणे लागला नाही म्हणजे सगळं संपलं असं नाही. परीक्षेला पुन्हा बसता येऊ शकतं किंवा इतर संधी असतातच. परीक्षेदरम्यान किंवा नंतर ताणाचा सामना करणं अवघड होतयं असं वाटलं तर ज्यांच्याकडे तुम्ही तुमचं मन मोकळं तरू शकता. अशा व्यक्तींशी बोला, पालक, शिक्षक, मित्रमंडळी यांच्याशी बोलून मन हलकं करण्याचा प्रयत्न करा. यातूनच समस्येवर उपायही सापडेल.


## दर्पण मध्येच ॲडमिशन का घ्यायचं?

उज्वल यशाची परंपरा.
वैयक्तिक मार्गदर्शन.
तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग.
व्यक्तिमत्व विकास वाढीस प्रोत्साहन.
अमर्याद सराव.
दररोज लेक्चर.
शैक्षणिक दरात एस.टी.पासची सोय.
अद्ययावत प्रॅक्टीकल लॅब.
जनरेटरची सोय.

एक विद्यार्थी एक कॉम्प्युटर.
FUNCTIONS
शैक्षणिक सहल.
सांस्कृतिक दिवस. Traditional Day.
विद्यार्थ्यांचे सादरीकरण. Seminar.
विविध कलागुणदर्शन.
Projector वर शिकण्याची खास व्यवस्था.



**पौर्णिमा मांढरे,**
न्हाळेवाडी
९६ % मार्क

|| सरकारमान्य || Govt.Reg No. MAH/10196/STR

**दर्पण कॉम्प्युटर, कोरेगांव.**

डी.पी.भोसले कॉलेज समोर, कोरेगाव मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२२१९३९

शाखा २ - दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर प्रभात टॉकीज शेजारी, कोरे हाईटस् मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२३०४३०



**शैक्षणिक सहलीचा आनंद लुटताना दर्पणचे विद्यार्थी...**

# जीवन....

जीवनात कधी रडायच नसतं,
हसतं पुढे जायचं असतं !!
संकटांना तोंड द्यायचं असतं,
खचून मागे जायचं नसतं !!
आयुष्य कधी संपवायचं नसतं,
जीवन हे अनमोल असतं !!
वेलीवरचं उमलतं फुल असतं,
पदर्पण फुलू द्यायचं असतं,
अर्धवट तोडायच नसतं !!
आई-वडिलांचं एक स्वप्न असतं,
स्वप्न ते साकारायचं असतं,
योग्य ते साकारायचं असतं !!
वाटेत कधी थांबायच नसतं,
जीवन हे असचं असतं !!
पूर्ण विचार केल्यावर,
वाटलं आता नाही जगायचं !
पण आलो एकदा जन्माला
समाजात नावं कमवायचं....!!
धन ऐश्वर्य संपत्ती,
दुपारची सावली आहे !
नसे भरोसा जिवनाचा,
सकाळ उद्याची कुणी पाहिली आहे !!
दिवस येत असतात,
दिवस जात असतात !
जीवन खरचं सुंदर आहे,
हे ते सांगत असतात !!
यशाइतकं जगात काहीच सुंदर नसतं,
म्हणून प्रत्येकाला यश सहजासहजी मिळत असतं !!
स्वप्नं आणि वास्तव यात खूप अंतर असतं,
प्रयत्नांच्या पावलांनी ते आपण गाठायचं असतं...!!

- कु. स्नेहल विजय जगताप. ११ वी सायन्स.

# आयुष्य ....

आयुष्याची स्वप्ने पाहताना,
वास्तवाला विसरायचं नसतं !
गुलाबाला स्पर्श करताना,
काट्यांना विसरायचं नसतं !!
प्रीतीच्या विश्वात वावरतांना,
जपून पाऊल टाकायचं असतं !
काळजाला झटका बसल्यावर,
कधी रडायचं असतं !!
संकटाच्या वादळात,
धीर धरून चालायचं असतं !
शत्रूशी झुंझताना,त्यास कमजोर लेखायचं नसतं !!
उध्वस्त झालेलं विश्व आपलं,
शुन्यातून उभं करायचं असतं !
आपल्या वेदनाचं मीठ मात्र,
दुसऱ्याच्या दुःखावर चीघळायचं नसतं !!
खाल्ल्या मिठाला हा जिवलग मैत्राला,
कधीच बेईमान व्हायचं नसतं !!
आईच्या दुधाचे अन् पित्यांच्या घामाचे,
उत्तराई झाल्याशिवाय !
मरणाचं नावसुद्धा घ्यायचं नसतं,
मरणाचं नावसुदधा घ्यायचं नसतं !!

- कु. स्नेहल विजय जगताप. ११ वी सायन्स.

# हाव

कुणाला असते पैशाची हाव,
कुणाला असते सत्तेची हाव ॥
कुणाला असते बाई - बाटलीची हाव,
या हावेला मर्यादा कशी नाही ॥
या हावेला थांबायचे कळत नाही,
ही हाव सुटली आहे ज्याला त्याला ॥
मग दोष द्यावा तरी कुणाला,
ही हाव आवळते आपुले पाश ॥
ही हाव करते सारा विनाश,
पण कुणाला हे कळतच नाही ॥
ही हाव आहे भारीच वाईट बाई,
रंक असू देत वा असू देत राव ॥
ज्याला त्याला सुटली आहे हाव,
या हावेपुढे मुले विसरतात आई-बाबा ॥
कोण जपतंय नाती-गोती,
हावेपुढे कुंठीत होते मति ॥
हावेची आहे ही किमया सारी,
हावेपायी बनली माणसे दुराचारी ॥

- कु. भोसले रविना रमेश, एकसळ

|| सरकारमान्य ||

# दर्पण कॉम्प्युटर्स

**कोरेगांव शाखा Center Code-13210084**
डी.पी.भोसले कॉलेज समोर, कोरेगाव
मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२२१९३९

**रहिमतपूर शाखा Center Code-13210207**
दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर प्रभात टॉकीज शेजारी,
कोरे हाईटस् मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२३०४३०

# यश तुमची वाट पहात आहे... तुम्ही तयार आहात ना?

सध्या वेगवान, स्पर्धात्मक कंप्युटर युगात यशाच्या वाटेवर स्वार होण्यासाठी **MS-CIT**

तुम्ही काय करू शकता :

* तुमची आवडती गाणी व व्हीडीओ क्लीप कंप्यूटर वरून मोबाईल वर ट्रान्सफर करु शकता.
* सिनेमाची तिकिटे ऑनलाईन बुक करु शकता.
* आवडते संगीत डाऊनलोड करु शकता.
* सी.डी. वरती आवडती गाणी साठवू शकता.
* कुटुंबाचा व मित्र वर्गाचा डिजीटल अल्बम करु शकता.
* पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करु शकता.
* ऑनलाईन शैक्षणिक व व्यावसायिक सोयीसुविधांचा शोध घेऊ शकता.
* पॉकिट मनी नुसार खर्चाचे नियोजन करु शकता.
* कंप्यूटरवरती डेस्क टॉप स्क्रीन डिझाईन करु शकता.
* सर्वांना ई ग्रीटींग तयार करून शुभेच्छा देऊ शकता.
* प्रोजेक्ट रिपोर्ट सुबक रीत्या सादर करु शकता.
* वैयक्तिक निमंत्रण पत्रिका करुन पाठवू शकता.
* अभ्यासाच्या वेळापत्रकाचे नियोजन करु शकता.
* शिक्षकांना व मित्रांना ऑनलाईन प्रश्न विचारु शकता.
* नोटस् देऊ शकता व मित्रांबरोबर चॅट करु शकता.
* शाळेच्या मित्रांचा ऑनलाईन शोध घेऊ शकता.

त्यामुळे....

* तुम्ही एक नेटीझन असाल.
* तुमचे ज्ञान इनसायक्लोपीडीया, विकीपीडीया, ई पुस्तकांद्वारे अद्ययावत असेल.
* त्यामुळे तुम्ही फेसबुक, ऑस्कुट, लिंगडइन द्वारे जागतिक आणि सामाजिक स्तराचा भाग असाल.
* तुमच्या वैयक्तीक व सामाजिक आदान प्रदानातून एक काळजी सुव्यवस्था बाळगली जाईल.
* तुमच्या ऑनलाईन देवाण घेवाणीमुळे बऱ्याच कागदांची बचत होईल.
* ई-बुकींग, ई बील पेमेंट या सारख्या सुविधांमुळे तुमच्या वेळेची खूप बचत होईल.
* अद्ययावत झाल्यामुळे शिक्षण, क्रिडा, करमणूक, सामाजिक क्षेत्रात अथवा.

आपली स्वप्न.... आपली आशा....

**MS-CIT** मुळे होतात सोप्या
यशाच्या अनेक समृद्ध वाटा !

* डेटाबेस मॅनेज करा
* स्प्रेडशीट तयार करा
* वर्ड प्रोसेसींग करा
* इंटरनेट शिका
* मेल अकाऊंट सेट करा

कमी कालावधी, माफक फी, योग्य मार्गदर्शन, आपल्या जवळच... सध्याच्या प्रगतशील युगात यशाच्या अनेक वाटा आपल्यासाठी उपलब्ध आहेत आणि आपण जर त्या साठी तयार असू तर यश आपलच. या अनेक पर्यायात पुढे जाण्यासाठी आणि आपण निवडलेल्या मार्गावर आत्मविश्वासाने झौडदौड करताना कोणीच रोखू शकणार नाही केवळ कंप्यूटरचे वरवरचे तोकडे ज्ञानच आपला घात करते आणि जाणकार मात्र जोमात पुढे जातात. तेव्हा वाट कसली बघता, आजच दर्पण कॉम्प्युटर मध्ये जा आणि आपल्या यशस्वीतेचा मार्ग अधिक सुकर करा.

दर्पण एज्युकेशन सोसायटीचे

**MKCL** मान्यताप्राप्त

Center Coad-13210084

# दर्पण कॉम्प्युटर, कोरेगांव

मार्च बॅच **MS-CIT** अंतिम मुदत २८ मार्च

## MS-CIT कोर्स फी

**एक रक्कमी - २८००/-**

**दोन हप्त्यात १५००+१४००=२९००/-**

**तीन हप्त्यात १०००+१०००+१०००=३०००/-**

**कोर्स कालावधी ३ महिने**

एप्रिल बॅच **MS-CIT** अंतिम मुदत १५ एप्रिल

**MS-CIT प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे**

१) ३ कलर फोटो (ब्रगाऊंड फेंट असावी)

२) ओळखपत्र ३) कोर्स फी

**दर्पण कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, कोरेगांव (बी.सी.ए.)**

डी. पी. भोसले कॉलेज समोर, कोरेगांव जि. सातारा

फोन : ०२१६३ - २२१९३९, मो. ९८२२०८४१३०



# दर्पण कॉम्प्युटरचे घवघवीत यश

## कोरेगाव शाखा

## जानेवारी बॅच २०११ मधील गुणवंत यादीत आलेले विद्यार्थी


जाधव कोमल लक्ष्मण
९२ % जळगाव


भिंगारे मालन धनाजी
९० % न्हाळेवाडी


शिंदे पुनम रामचंद्र
८६ % तांदुळवाडी


खाडे आकाश नारायण
८४ % कोरेगाव




फडतरे उमेश बाळासो
८४ % कोरेगाव


चव्हाण वनिता विष्णू
८२ % कोरेगाव


चव्हाण सागर वसंत
८० % चंचळी


मोरे नितीन दिनकर
८० % चिमणगाव

## Tally बॅच २०११ मधील गुणवंत यादीत आलेले विद्यार्थी


विकास शंकर बर्गे
कोरेगांव ८७%


रेश्मा वसंत शिंदे
कोरेगांव ८६%


पुजा किशोर काशिद
कोरेगांव ८६%


स्नेहल शशिकांत बर्गे
सुलतानवाडी ८५%


अभिजीत प्रभाकर बर्गे
कोरेगांव ८४%


करिश्मा शिकंदर मुलाणी
कुमठे ८४%


प्रथमेश कुमार महाडीक
कोरेगांव ८३%


भाग्यश्री ज्ञानेश्वर पवार
जांब खेड ८३%


भाग्यश्री सुरेश ननावरे
कोरेगांव ८२%


अभिजीत संजय मोरे
चिमणगांव ८२%


अशोक बाजीराव मोरे
एकसळ ८२%


शहीनाज हसन मुलाणी
कुमठे ८२%


रोहिणी अंकुश साळुंखे
एकसळ ८२%


रेशमतुल्ला बशिर तांबोळी
कोरेगांव ८२%


पुष्पा सुदाम खरात
तडवळे ८२%

# दर्पण कॉम्प्युटरचे घवघवीत यश

## कोरेगाव शाखा

# मार्च २०११ मधील गुणवंत यादीत आलेले विद्यार्थी















| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पिलारे शोभराज राजकुमार<br>९८% कोरेगांव | इदाते अतुल दत्तात्रय<br>९६% एकंबे | भोसले सुजित हणमंत<br>९४ % कोरेगाव | भोईटे ज्योती शर्जेद्र<br>९० % कोरेगाव | नांदे सागर अशोक<br>९० % कोरेगाव | नेटके प्रिती बापु<br>९० % कण्हेरखेड | बर्गे वर्षा धनंजय<br>८८ % सुलतानवाडी | भोसले कोमल विठ्ठल<br>८८ % शिरंबे | भोसले सोनम अंकुश<br>८८ % कण्हेरखेड |
| घोरपडे गुरुदत्त संपत<br>८८ % शिरढोण | कांबळे संदेश महावीर<br>८८% कोरेगाव | कांबळे सोनम शहाजी<br>८८ % चंचळी | शेलार प्राजक्ता अशोक<br>८८ % एकसळ | बर्गे आशिष प्रदिप<br>८६ % कोरेगाव | बर्गे मंजिरी संजय<br>८६ % कोरेगाव | भोसले दामिनी विठ्ठल<br>८६ % कोरेगाव | घोरपडे श्रीकांत देवानंद<br>८६ % सायगांव | सावंत रोहित सुनिल<br>८६ % कोरेगाव |
| माने प्रिया रविंद्र<br>८६ % चिमणगांव | बर्गे यशवंत युवराज<br>८४ % कोरेगाव | भोसले आकाश दशरथ<br>८४ % कोरेगाव | बोबडे निलम शंकर<br>८४ % कोरेगाव | देशमुख ज्योती जयसिंग<br>८४ % कोरेगाव | कांबळे अजिता श्यामराव<br>८४ % वेलंग | केंजळे नितिश मिलिंद<br>८४ % कोरेगाव | नेटके करिश्मा अनिल<br>८४ % कण्हेरखेड | पवार व्यंकटेश<br>८४ % कोरेगाव |
| भुजबळ धीरज दिलीप<br>८२ % कोरेगाव | भुतकर सौरभ चंद्रकांत<br>८२ % कोरेगाव | घाडगे प्राजक्ता रविंद्र<br>८२ % घाडगेवाडी | गुरव ऋतुजा दत्तात्रय<br>८२ % चिमणगांव | जाधव अर्चना रामचंद्र<br>८२ % नांदगिरी | जगताप किरण कैलास<br>८२ % कोरेगाव | कासुर्डे अजय प्रकाश<br>८२ % निगडी | क्षीरसागर संदेश अशोक<br>८२ % एकसळ | फाळके सोनम विजय<br>८२ % अंबवडे |
| शिंदे मंगेश शरद<br>८० % कोरेगाव | भोसले कोमल मोहन<br>८० % किन्हई | भोसले अनिकेत राजेंद्र<br>८० % वडाचीवाडी | घोरपडे दैवता निवास<br>८० % कोरेगाव | गोळे काजल सुनिल<br>८० % वेलंग | घोरपडे विकी विलास<br>८० % शिरढोण | जगदाळे कोमल राजेंद्र<br>८० % कुमठे | कदम पुनम राजेंद्र<br>८० % चंचळी | महामुलकर सागर<br>८० % गोळेवाडी |
| धर्माधिकारी माधुरीमा राजेंद्र<br>८८ % कोरेगाव | घाडगे कोमल दादासो<br>८८ % घाडगेवाडी | घाडगे शितल रमेश<br>८८ % घाडगेवाडी | जाधव निखिल सुनिल<br>८६ % चिमणगांव | जगताप धीरज परशुराम<br>८६ % वेलंग | कुंभार करुणा गणपत<br>८६ % चिमणगांव | बर्गे अश्विनी नारायण<br>८२ % कोरेगाव | भोसले कल्याणी धोंडीराम<br>८२ % एकसळ | चव्हाण अर्चना सतिश<br>८२ % शिरढोण |
| | पिसाळ तृप्ती पांडुरंग<br>८२ % एकसळ | शिंदे अमर फत्तेसिंग<br>८२ % कण्हेरखेड | जाधव स्नेहल हणमंत<br>८० % शिरढोण | मतकर काजल चंद्रसेन<br>८० % तांदुळवाडी | शेडगे विशाल दिलीप<br>८० % कोरेगाव | साळुंखे निशा हिरालाल<br>८०% कोरेगाव | | |

मार्च बॅच MS-CIT
अंतिम मुदत २८ मार्च

एप्रिल बॅच MS-CIT
अंतिम मुदत १५ एप्रिल

# या आहेत बोलक्या प्रतिक्रिया

**'दर्पणच्या' विद्यार्थ्यांनी आपल्या अशा लिखीत स्वरुपाच्या प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत.**



विद्यार्थ्याचे नांव -
कु. सोनम विजय फाळके,
अंबवडे सं. कोरेगांव

आपल्या टिचरविषयी आपले मत :- दर्पण कॉम्प्युटर क्लासेसमधील सर्वच शिक्षक मनमिळाऊ आहेत. येथील शिक्षक हे विद्यार्थ्यांना कधीही विद्यार्थी समजत नाहीत. ते विद्यार्थ्यांना आपले मित्र मैत्रिणी समजून शिकवतात. येथील शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देतात. कोणालाही कमी लेखत नाहीत ते खूप छान सोप्या पद्धतीने शिकवतात, व सर्वांना समजल्याशिवाय पुढे शिकवत नाहीत.

दर्पण क्लासविषयी आपले मत :- ज्यांना ज्यांना कॉम्प्युटरचा MSCIT किंवा आणखी काही क्लासेस लावायचे असतील त्यांनी दर्पण कॉम्प्युटर क्लासेसमध्येच क्लास लावावा असे माझे मत आहे. दर्पण क्लासेसमध्ये दरवर्षी ट्रीपचे आयोजन केले जाते व सुंदर सुंदर ठिकाणी फिरायला नेले जाते. तसेच या क्लासमध्ये सेमिनार आयोजित केले जातात व सर्व विद्यार्थ्यांना त्यात सामावून घेतले जाते. तसेच दर्पण क्लासेसमध्ये सर्वांचे birthday celebration सुद्धा केले जाते, केक कापून सर्वांना खाऊसुद्धा वाटप केले जाते. येथील शिक्षक अतिशय मनमिळाऊ आणि प्रेमळ आहेत. ते खूप छान व सोप्या पद्धतीने शिकवतात व प्रॅक्टीस करण्यासाठी जास्त वेळ देतात. क्लासमध्ये ट्रॅडिशनल डे सुद्धा सुंदरित्या साजरा केला जातो आणि send off सुद्धा छान केला जातो.

क्लासविषयी काही सूचना असल्यास :- दर्पण क्लास हा अतिशय उत्कृष्ट असल्याने कोणत्याही बदलाची अथवा सूचनेची गरज नाही.

[illegible] नाव: सोनम विजय फाळके सही: S.Phalke

विद्यार्थ्याचे नांव -
कु. रविना रमेश भोसले
एकसळ ता. कोरेगांव



आपल्या टिचरविषयी आपले मत :- क्लासमधील सर्व (शिक्षक) टिचर मुलांसोबत फार प्रेमळ आहेत पण शिस्तीच्या बाबतीत अतिशय कडक आहेत. ते सर्वांशी प्रेमाने बोलतात. आमच्या टिचर प्रत्येकाला लेक्चरनंतर काही शंका असेल तर माहिती देतात आणि प्रश्न सोडवून देतात.

दर्पण क्लासविषयी आपले मत :- दर्पण क्लास हे कोरेगावातील एक आधुनिक आणि विश्वसनीय क्लास आहे.

नलवडे सर हे दर्पण क्लासचे प्रमुख आहेत. दर्पण म्हणजे आरसा आणि हा क्लास ही आरशाप्रमाणेच स्वच्छ आहे. तसेच दर्पण क्लासमधील सर्व टिचर अतिशय प्रेमळ आणि सर्व बाबतीत ज्ञानी व परिपूर्ण आहेत. टिचर नेहमी सर्वांशी प्रेमाने बोलतात. टिचर सर्व विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करतात. तसेच श्री. नलवडे सर व मॅडमचे नेहमी हेच मत असते की त्यांच्या क्लासमधील विद्यार्थी सर्व संगणकाच्या सर्व बाबतीत परिपूर्ण व्हावेत.

सर्व टिचर अतिशय प्रेमळ व मायाळू आहेत तसेच शिस्तीच्या बाबतीत अतिशय कडक आहेत. तसेच नलवडे सर ही शिस्तीच्या बाबतीत कडक आहेत परंतु स्वभावाने अतिशय छान आहेत.

बर्गे मॅडम व अनिता मॅडम संगणकाच्या ज्ञानाच्या बाबतीत अतिशय हुशार आहेत तसेच इतरही मॅडम खूपच हुशार आहेत. दर्पण क्लासमध्ये ॲडमिशन घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मॅडम नेहमीच मोलाचा संदेश देतात व या जगात आत्मविश्वासाने कसे जगायचे ते सांगतात.

क्लासविषयी काही सूचना असल्यास :- दर्पण क्लास सर्व बाबतीत परिपूर्ण असल्यामुळे माझ्या क्लासविषयी काही ही सूचना नाहीत.

विद्यार्थ्याचे नांव -
संकेत रविंद्र माने
भोसे ता. कोरेगांव



आपल्या टिचरविषयी आपले मत :- आमच्या टिचरचे नाव प्रियंका मॅडम आहे. त्या खूप चांगल्या आहेत. त्या आमचे लेक्चर घ्यायच्या. त्या आम्हाला मॅडम नाही तर आमच्या Friend सारख्या शिकवत असत. त्यांनी आम्हाला Computer चे जे ज्ञान या जगात वावरण्यासाठी पाहिजे ते त्यांनी आम्हाला दिले आहे.

प्रभात पहाटे मिळतो तसा प्रकाश आहे
त्याहून कोणताही कमी नसलेला ज्ञान अधिक
दुरापास्त आहे
कुठे प्रयत्न असतो तसे ज्ञान आणि शिक्षण
मिळते तेथे प्रकाश आहे.

दर्पण क्लास हा खूपच चांगल्या प्रकारचा क्लास आहे. त्यामध्ये शिक्षण घेताना खूपच बरे वाटले. शिकवण्याची पद्धत ही खूपच वेगळी आहे. त्या क्लासमध्ये ट्रेडिशनल डे, वाढदिवस साजरे केले.

शिक्षण घेताना बरेच काही विसरायचे असते
पण बरेच काही विसरताना
आपण कशासाठी शिकलोय
हे मात्र विसरायचे नसते
एवढी ममता मिळाली प्रकाशात
दर्पण क्लासेसचे नाव भारताच्या नकाशात

क्लासविषयी काही सूचना असल्यास :- Practical साठी LCD Projector ची सुविधा करावी.



विद्यार्थ्याचे नांव -
कु. प्रियांका राजेंद्र जेधे
वेलंग पो. शिरंबे ता. कोरेगांव

आपल्या टिचरविषयी आपले मत :- मी 10 ते 12 या बॅचसाठी प्रवेश घेतला. मला 10 ते 11 या लेक्चरसाठी बर्गे मॅडम होत्या. त्यांचा स्वभाव खूप छान आहे. त्या शिकवतातही खूप छान. त्या एक चांगल्या शिक्षिकेप्रमाणेच एक चांगल्या मैत्रिण देखील आहेत. तसेच त्या एक चांगली मोठी बहिण देखील आहेत. त्यांनी आम्हाला कंप्यूटरविषयक खूप छान ज्ञान दिले. खूप प्रेमळपणे त्यांनी आम्हाला शिकवलेच पण वेळ पडलीच तर त्यांनी हक्काने आमच्यावर रागावून आम्हाला ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले.

दर्पण क्लासविषयी आपले मत :- दर्पण क्लासविषयी सांगायचे म्हटले तर कितीही सांगितले तरी कमीच आहे. दर्पण क्लासमधील सर्व शिक्षक स्टाफ खूप छान आहे. आम्हाला शिकवण्यासाठी बर्गे मॅडम होत्या. त्यांनी वेळोवेळी आम्हाला मार्गदर्शनाचे कार्य केले परंतु त्याचबरोबर प्रियांका मॅडम, अनिता मॅडम, काजल मॅडम, पुनम मॅडम, स्वाती मॅडम यांनीही आम्हाला खूप ज्ञान दिले. तसेच सर्व शिक्षक स्टाफ आमच्याशी खूप प्रेमळपणे वागला. नलवडे सरांनीही आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन केले. बाहेरगावाहून येणाऱ्या मुलांसाठी त्यांनी गाडीची सोय उपलब्ध करून दिली. अशा प्रकारे त्यांनी प्रत्येक मुलाची चांगल्या प्रकारे काळजी घेतली.

दर्पण क्लासमध्ये सगळ्यांचे वाढदिवस साजरे केले गेले. तसेच ट्रॅडिशनल डे, निरोप समारंभ साजरे केले गेले. त्यामुळे तीन महिन्याचा कालावधी कसा गेला ते सुद्धा आम्हाला समजले नाही. आतापर्यंत आम्ही फक्त खाली बसून शिकत होतो, [illegible]

# या आहेत बोलक्या प्रतिक्रिया

## 'दर्पणच्या' विद्यार्थ्यांनी आपल्या अशा लिखीत स्वरुपाच्या प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत.



विद्यार्थ्यांचे नांव -
कु. कल्याणी धोंडीराम भोसले
एकसळ कोरेगांव

आपल्या टिचरविषयी आपले मत : दर्पण कॉम्प्युटर मध्ये एम एस सी आय टी या कोर्सचा अभ्यास करत असताना वर्गे मॅडम यांच्या शिक्षण-पद्धतीमुळे मला कोर्सविषयी आवड झाली व याची आस्थीन आग्न माहिती मिळाली व त्यामुळेच मी चांगले गुण मिळवू शकली.

शासनाने केली तंत्रज्ञानाची सक्ती
Computer क्षेत्रात MS-CIT हीच शक्ती

कोर्स कशाला आम्ही कुठे ?
Darpan मुळे प्रश्न सुटे

(विद्यार्थ्यांच्या प्रोग्रीन नाही गुदमरा)
वीज गेली तर जनरेटरचा पुरवठा

प्रत्येकाला मिळतो सेपरेट P.C.
very good room you see

दर्पण म्हणजे आपली प्रतिबिंब
Admission घ्यायला नको विलंब

दर्पण तुमचा खरा मित्र
लवकर या, संपले आता द्वितीय सत्र

आम्ही आता कुठे चालणार
Darpan असताना चिंता कशाची.



विद्यार्थ्यांचे नांव -
कु. काजल सुनिल गोळे
वेलंग ता. कोरेगांव

आपल्या टिचरविषयी आपले मत : मी सकाळी 10 ते 12 या बॅचला होते. आमच्या बॅचला मार्गदर्शन करणारे व ज्ञान देणारे असे सर्व शिक्षक होते. सर्व शिक्षकांचे [illegible] एक शिक्षक न होता त्या आमच्यात मैत्रिणीप्रमाणे मिसळायच्या. त्यांचा स्वभाव अतिशय छान आहे.

दर्पण क्लासविषयी आपले मत :- [illegible]

[illegible]

क्लासविषयी काही सुचना असल्यास : [illegible]



विद्यार्थ्यांचे नांव -
धीरज मनोहर भोसले
कोरेगांव

आपल्या टिचरविषयी आपले मत :- In Darpan computer all the teacher and state was very good. The teacher Borge miss was teaching use very nice even I like there teaching but Borge miss was all ways explane me which I did not understand. And other teacher where not had they also teach use very nice but most Borge miss was working hard.

दर्पण क्लासविषयी आपले मत :- Darpan is nice place of study computer. Here all the student from other village can come and study. Here we got to handle the computer in our hand. Nobody has not handle the computer it is not happens. All can get to study the computer. All the teacher state was very nice but Borge miss and chitra miss was teaching use. They teach use very nice that I could understand. We enjoy the class of Borge miss.

Our class time was 4 to 6. My friends and I enjoy the class. also we enjoy Practical. The meanings of Practical is to connected with practice.

क्लासविषयी काही सुचना असल्यास :- I am having one Notes that some one on my place can come. That time all the teachers should make him to understand like How you was teaching me.

प्रतिक्रिया लिहिणारे नाव [Bhosale Dhiraj Manohar] सही [signature]



विद्यार्थ्यांचे नांव -
कु. आरती बबन आवाड
चिमणगांव ता. कोरेगांव

दर्पण क्लासविषयी आपले मत :- दर्पण क्लास हा अत्यंत परिपूर्ण MS-CIT करण्याचा एक मार्ग आहे.
दर्पण क्लास हा खूप चांगला आहे.
"East or West
Darpan is Best."

दर्पण क्लासमध्ये MS-CIT, B.C.A., TALLY इतर खूप course चांगल्या प्रकारे होतात.

दर्पण क्लासमधील Teachers, Sir स्वभावाने प्रेमळ, मनमिळावू आहेत. त्यामुळे माझा MS-CIT course हा हसत-खेळत आनंदाने झाला. ते क्लासचे तीन्ही महिने अविस्मरणीय आहेत.
दर्पण क्लासमधील Birthday हे खूप चांगल्या प्रकारे celebrate करतात.
Traditional day दिवशी अनेक विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला.
मी एवढेच म्हणेन दर्पण क्लास हा एक जीवनातील सुख, दुख, आनंद इ. वाटणारे आहे.
"Darpan is Base of the life"



विद्यार्थ्यांचे नांव -
कु. अमृता भानुदास पाटोळे
एकसळ ता. कोरेगांव


दर्पण एज्युकेशन सोसायटीचे
MKCL मान्यताप्राप्त
Center Code-13210207

**दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर**

'करीअरला' दिशा देण्याचा एक नवा पर्याय !

**उन्हाळी सुट्टीत MS-CIT शिका अन् लॅपटॉप जिंकण्याची संधी मिळवा !**

MS-CIT मार्च बॅचला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लकी ड्रॉ योजनेअंतर्गत खालील बक्षीसे जिंकण्याची संधी !

प्रथम क्रमांक । लॅपटॉप
द्वितीय क्रमांक । डिजीटल कॅमेरा
तृतीय क्रमांक । मोबाईल हँडसेट

**MS-CIT प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे**
१) ३ कलर फोटो (ब्राऊंड वेट असावी)
२) ओळखपत्र ३) कोर्स फी


दर्पण क्लासविषयी आपले मत :- संपूर्ण महाराष्ट्रभरात विश्वसनीय असे एकमेव एम. एस. सी. आय. टी. चे अधिकृत सेंटर आहे हे म्हणजे दर्पण Computer येथे मी शिक्षण घेतले याचा मला खूप अभिमान आहे.
त्या क्लासमध्ये शिकवत असणाऱ्या सविता बर्गे मॅडम, अनिता शिंदे मॅडम, प्रियांका शेलार मॅडम यांची शिकवण्याची एकदम सोपी पद्धत सोप्याकरित्या समजावून सांगणे यामुळे एम. एस. सी. आय. टी. चे 3 महिने कसे पूर्ण झाले हे मला कळले नाही.
मी ज्यावेळी क्लासला जाण्यास सुरुवात केली तेव्हा मला व Computer कसा हाताळायचा Computer विषयी थोडेही ज्ञान अवगत नव्हते. पण क्लासला जाण्यास सुरुवात केल्यापासून मला Computer चे ज्ञान होणे माहिती जाणून होणे यांची आवड मनामध्ये निर्माण झाली. तेव्हापासून मी Computer चे पूर्ण उपयोग, माहिती मिळविणे जाणून घेऊ शकली.
तेव्हापासून मी माझ्या सर्व मित्र-मैत्रिणींना दर्पण क्लासमध्ये शिक्षण घेण्याचा सल्ला देत आहे.

क्लासविषयी काही सुचना असल्यास : काही इथून पुढे असेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही नम्र विनंती.

दर्पण एज्युकेशन सोसायटीचे

**MKCL** मान्यताप्राप्त

Center Code-13210207

# दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर

**'करीअरला' दिशा देण्याचा एक नवा पर्याय !**

## उन्हाळी सुट्टीत MS-CIT शिका अन् लॅपटॉप जिंकण्याची संधी मिळवा !

**MS-CIT मार्च बॅचला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लकी ड्रॉ योजनेअंतर्गत खालील बक्षीसे जिंकण्याची संधी !**



प्रथम क्रमांक । लॅपटॉप

द्वितीय क्रमांक । डिजीटल कॅमेरा

तृतीय क्रमांक । मोबाईल हँडसेट

## MS-CIT कोर्स फी

एक रक्कमी - २८००/-

दोन हप्त्यात १५००+१४००=२९००/-

तीन हप्त्यात १०००+१०००+१०००=३०००/-

कोर्स कालावधी ३ महिने

एप्रिल बॅच **MS-CIT**
अंतिम मुदत १५ एप्रिल

मार्च बॅच **MS-CIT**
अंतिम मुदत २८ मार्च

**MS-CIT प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे**

१) ३ कलर फोटो (ब्रगाऊंड फेंट असावी)


२) ओळखपत्र ३) कोर्स फी

# करिअर निवडताना....

भविष्याची विलोभनिय स्वप्न रंगवत करीअर निवडण्यापेक्षा वर्तमानाचे स्वत:च्या स्वभाव वैशिष्ठ्यांचे भान ठेवून शैक्षणिक पर्याय निवडावा. अन्यथा उत्साहाच्या भरात प्रवेश घेतला जातो. पण त्यामुळे येणारा मानसिक ताण, श्रम त्या विद्यार्थ्याला पेलवत नाही. आणि मग तो विद्यार्थी अपयश, त्यातून पैशांचा खर्च आणि आयुष्यातील महत्वाची वर्षेवाया जाणे, ताणतणाव वाढणे, निराश होवून टोकाची पावले उचलणे या दुष्ट चक्रात सापडतो.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्यानंतर करीअर निवडीच्या मोठ्या महत्वपूर्ण प्रश्नांना त्यांना सामोरे जावे लागणार आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात करीअरच्या विविध संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. वेगवेगळे, नवनवीन क्षेत्रे विद्यार्थ्यांना खुणावत असतात. प्रत्येकालाच आपले भविष्य उज्वल करायचे असते. प्रत्येकाला आर्थिक स्थैर्य देणारा, नावलौकीक देणारा करीअर पर्याय आकर्षित करत असतो. हवा-हवासा वाटतो. या सुट्टीमध्ये विविध करीअरची माहिती देणाऱ्या करीअर मेळाव्याचे आयोजन होत असते. एवढेच नाही तर निरनिराळ्या वृत्तपत्रांतून, इंटरनेटवरून नवनवीन करीअरची माहिती विद्यार्थी व पालक यांना मिळत असते. म्हणजे कुठल्या विशिष्ठ करीअरसाठी कुठली डिग्री आवश्यक आहे? ती मिळविण्याची संधी कुठल्या कॉलेजमध्ये मिळू शकते? तीचा कालावधी किती? प्रवेशासाठी कमीत कमी किती गुणांची आवश्यकता आहे? फी किती असते आणि त्यानंतर व्यवसायाची संधी कुठल्या क्षेत्रात मिळू शकते? ही सर्व माहिती करीअर मेळाव्यामधून मिळते. या माहितीच्या जोडीला, व्यक्तीपरत्वे सुयोग्य करीअर निवडीसाठी आणखी काही महत्वाच्या गोष्टींचा विचार अत्यंत जरुरी असतो. पण त्याच बाबी नेमक्या दुर्लक्षीत केल्या जातात. म्हणूनच विद्यार्थी पालकांशी हितगुज करावेसे वाटले !

सुरुवात करुया....विद्या शाखा निवडण्याच्या निर्णयापासून. दहावीच्या निकालानंतर महत्वाचा निर्णय घ्यावा लागतो तो विद्या शाखा निवडीचा ! साधारणत: दहावीत मिळालेले टक्के हा शाखा निवडीत निर्णायक मुद्दा ठरतो. ८० टक्के व त्यापेक्षा जास्त गुणांच्या विद्यार्थ्यांचा कल सहजपणे विज्ञान शाखेकडे असतो. हे थोडे की काय तर पालक, मित्र मैत्रीणी यांचा प्रभाव ह्या शाखा निवडीत बाजी मारतो. काहीवेळा पालकही आपली अर्धवट राहिलेली स्वप्ने पाल्याकरवी पूर्ण करू पाहतात. या



**टेस्ट करा, बेस्ट बना !**
**MS-CIT दर्पणमध्ये करा !**

सगळ्या गोष्टींच्या एकत्रीत परिणामातून शाखा निवड होते. खरंतर जीवनातील या महत्वपूर्ण निवडीला विचारांची एक पक्की बैठक असायला हवी. दहावीच्या गुणांबरोबर विद्यार्थ्याची आवड, त्याच्या व्यक्तीमत्वातील मेहनत करण्याची वृत्ती, चिकाटी, कल्पकता, गणितीय आकडेमोडीची सहजता अशा अनेक पैलूंचा विचार पालक, विद्यार्थी

|| सरकारमान्य ||
**दर्पण कॉम्प्युटर्स**

**कोरेगांव शाखा Center Code-13210084**
डी.पी.भोसले कॉलेज समोर, कोरेगाव
मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२२१९३९

**रहिमतपूर शाखा Center Code-13210207**
दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर प्रभात टॉकीज शेजारी,
कोरे हाईटस् मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२३०४३०

# असे मिळाले घवघवीत यश

## दर्पण कॉम्प्युटर्स कोरेगांवच्या शोभराज भिलारे याने १०० पैकी ९८ गुण मिळाले

No.: 00093917

Maharashtra State Board of Technical Education, Mumbai

Maharashtra Knowledge Corporation Limited
|| Creating a Knowledge Lit World ||



This is to certify that
*BHILARE SHOBHRAJ RAJKUMAR*

The withinsigned having successfully completed the prescribe course of studies and having passed the examination with 98 percent marks has been awarded the
***Maharashtra State Certificate in Information Technology (MS-CIT)***
On behalf of the Government of Maharashtra in the month of *June - 2011* in testimony whereof are set the seals and signatures of the Director, Maharashtra State Board of Technical Education, Mumbai and the Managing Director, Maharashtra Knowledge Corporation Limited.

| Section Number | Section Name | Marks Obtained | Maximum Marks |
|---|---|---|---|
| I | Learning Process* | 25 | 25 |
| II | Mid Term Examination* | 24 | 25 |
| III | Final Examination | 49 | 50 |
| | TOTAL MARKS | 98 | 100 |

Following is the criteria for passing the MS-CIT Examination successfully.
Aggregate score of 40 marks (in sections I, II & III) out of 100 with:
- Combined score of Minimum 20 Marks out of 50 is required (for passing in section I & II).
- Minimum 20 marks out of 50 are required for passing MS-CIT Examination (in section III) with at least 6 marks in Objective and 14 marks in the practical.

Director
MSBTE

Managing Director
MKCL



शोभराज भिलारे
१०० पैकी ९८ गुण

00232313

Maharashtra State Board of Technical Education, Mumbai

Maharashtra Knowledge Corporation Limited
|| Creating a Knowledge Lit World ||



This is to certify that
*MANE SANKET RAVINDRA*


The withinsigned having successfully completed the prescribed course of studies and having passed the examination with 97 percent marks has been awarded the
***Maharashtra State Certificate in Information Technology (MS-CIT)***
On behalf of the Government of Maharashtra in the month of *July - 2011* in testimony whereof are set the seals and signatures of the Director, Maharashtra State Board of Technical Education, Mumbai and the Managing Director, Maharashtra Knowledge Corporation Limited.

| Section Number | Section Name | Marks Obtained | Maximum Marks |
|---|---|---|---|
| I | Learning Process* | 25 | 25 |
| II | Mid Term Examination* | 24 | 25 |
| III | Final Examination | 48 | 50 |
| | TOTAL MARKS | 97 | 100 |

Following is the criteria for passing the MS-CIT Examination successfully.
Aggregate score of 40 marks (in sections I, II & III) out of 100 with:
- Combined score of Minimum 20 Marks out of 50 is required (for passing in section I & II).
- Minimum 20 marks out of 50 are required for passing MS-CIT Examination (in section III) with at least 6 marks in Objective and 14 marks in the practical.

Director
MSBTE

Managing Director
MKCL



संकेत माने
१०० पैकी ९७ गुण

# दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर Center Code-13210207

**MS-CIT मार्च बॅचला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना**

**लकी ड्रॉ योजनेअंतर्गत खालील बक्षीसे जिंकण्याची संधी !**



रहिमतपूर शाखा - कॉम्प्युटर लॅब कडे



रहिमतपूर शाखा - ऑफिस



रहिमतपूर शाखा - कॉम्प्युटर प्रशस्त लॅब

## रहिमतपूर शाखेची वैशिष्ठ्ये -

- १०० पैकी १०० मिळवूण देणारे तालुक्यातील एकमेव सेंटर
- लोडशेडिंवर मात करण्यासाठी शक्तीशाली जनरेटरची सुविधा
- शैक्षणिक दरात एस. टी. पासची सोय
- २० कॉम्प्युटर असणारी सुसज्ज लॅब
- एक विद्यार्थी एक कॉम्प्युटर
- दररोज लेक्चरची सोय



**उन्हाळी सुट्टीत MS-CIT शिका अन् लॅपटॉप जिंकण्याची संधी मिळवा !**

प्रथम क्रमांक । लॅपटॉप
द्वितीय क्रमांक । डिजीटल कॅमेरा
तृतीय क्रमांक । मोबाईल हॅंडसेट

दोघांनीही प्रामाणिकपणे करायला हवा. विद्यार्थ्यांना निसर्गदत्त बहाल झालेल्या गुणांचा उपयोग भविष्यासाठी करुन घेतला तर यश मिळविणे तुलनात्मकतेने सोपे होते. व्यक्तीपरत्वे योग्य शाखा निवडीचा निर्णय भविष्यात यशाची खात्री देतो.

शाखा निवड झाली की पुढचा प्रश्न असतो प्रवेश कुठल्या कॉलेजमध्ये घ्यावा. दहावीला उत्तम गुण मिळालेल्या विद्यार्थ्याला त्याच्या मनाजोगत्या कॉलेजमध्ये सहज प्रवेश मिळतो. सर्वसाधारणपणे नावाजलेल्या मोठ्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा असे प्रत्येकालाच वाटते. ११ वी, १२ वी ही दोन वर्षेपुढील करीअरची पायाभुत वर्ष आहेत. या काळात अनावश्यक शारिरीक श्रम आणि वेळेचा बचाव याला प्राधान्य द्यायला हवे. कॉलेजच्या नावारूपाला न भाळता मनावर ताबा ठेवून अत्यावश्यक सोई असलेले व घरापासून जवळ असलेले कॉलेज प्रवेशासाठी प्राधान्याने निवडले पाहिजे. विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना तर कॉलेज, प्रात्यक्षिके, कोचींग क्लासेस अन् अवाढव्य अभ्यास यात ताळमेळ साधता साधता नाकीनऊ येतात. या कसरतीत स्वअभ्यासाला वेळ कसा मिळवायचा, वेळ मिळालाच तर दिवसभराच्या दगदगीतून शारीरीक ताकद, उर्जा टिकवायची कशी, या समस्यांनी ते त्रस्त होतात. राहत्या घरापासून लांब कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तर त्यामुळे प्रवासाचा वेळ त्यातील थकवा यांनी या समस्या अधिक उग्र होतात. सकाळी लवकर घराबाहेर पडणे व उशीरा घरी पोहोचने यामुळे खाण्यापिण्याचेही वेळापत्रक, तंत्र बिघडते आणि त्याचा परिणाम आरोग्यावर होतो.

यश मिळविण्यासाठी आरोग्यही महत्वाचेच ! जवळपासच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यास वेळ, श्रम तर वाचतीलच पण विद्यार्थ्यांच्या भाऊ गर्दीत हवण्यापेक्षा मोजक्या विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेच्या जोरावर विद्यार्थी कौतुकास पात्रही ठरेल. वैयक्तिक लक्षही पुरविले जावू शकते.

बारावीच्या गुणांवर विद्यार्थी भविष्यात इंजिनीअर, डॉक्टर, अर्किटेक्ट किंवा सी. ए. बनणार, हे ठरणार असते. प्रत्येक करीअरसाठी विशिष्ठ शैक्षणिक पात्रतेबराबर व्यक्तीमत्वातील काही गुणांची आवश्यकता असते. उदा. उत्तम डॉक्टर होण्यासाठी उच्च बुध्दिमत्ता तर हवी असते, पण यशस्वीतेसाठी चिकाटी, अविरत कामाची तयारी, निर्णयक्षमता, सुक्ष्म निरीक्षणाची सवय, अनियमित वेळापत्रकातही काम करण्याचा हुरुप या गुणांची नितांत गरज आहे.

यशस्वी आर्किटेक्ट व्हायचे असेल तर बुध्दिमतत्ता तर हवीच पण त्याबरोबर कल्पकता, कलात्मकता, कायद्याचे ज्ञान, समाजातील सर्व स्तरांतील लोकांच्या आवडीनिवडीची जाण ही हवी. एखादा प्रतिथयश डॉक्टर, आर्किटेक्ट, वकिल बघितला की आपणही डॉक्टर व अर्किटेक्ट व्हायचे आणि भरपूर पैसा कमवायचा असा उथळ निर्णय घेवून विद्यार्थी वर्ग मोकळा होतो. करीअर निवड हा असा क्षणिक निर्णय असूच शकत नाही. आपण शिखरांचा मोह धरतो पण ते शिखर गाठायला काय कष्ट द्यावे लागतात, काय कुवत लागते. याचा विचार आधी व्हायला हवा तेंव्हाच शिखर पादाक्रांत होवू शकेल.

जेव्हा स्वप्न, लक्ष्य, गगणभेदी असतात तेंव्हा त्यासाठी अथक परिश्रम लागतात. आपले लक्ष्य आणि प्रयत्न यातील दरी जेंव्हा वाढत जाते तेंव्हा यश धुसर होत जाते. त्यामुळेच वाटतं डॉक्टर पेशाकडे वळण्यापेक्षा त्यात प्राप्त आहे. आवड, क्षमता आणि शैक्षणिक पात्रता या साऱ्यांचा ताळमेळ साधत शैक्षणिक पर्याय निवडला तर विरस होणार नाही. यासाठी गरज आहे ती निपक्षपातीपणे प्रामाणिकपणे आणि डोळसपणे आपल्यातील गुणदोषाच्या अभ्यासाची. स्वतःला आहोत तसेच स्विकारण्याची ! जोडीला हवा आत्मविश्वास. एकदा हे आत्मपरीक्षण झाले की, मग करीअर मेळाव्यातून माहितीच्या अधिकारातून स्वतःसांठी सुयोग्य करीअर पर्याय निवडता येईल. त्यापाठोपाठ येईल यशाची खात्री.

कुठलेही काम चांगले वा वाईट अशा वर्गवारीत विभगता येणार नाही. कामाप्रतीची, व्यवसाय प्रतीची आपली निष्ठा फार महत्वाची आहे. उत्तम उदहारण म्हणजे यशस्वी शेफ- संजीव कपूर ! त्यांनी वेळीच आपली आवड अन् कल ओळखला अन् करीअरची निवड केली. <u>योग्यवेळी सुयोग्य करीअर निवड हेच जीवनातील यशाचे गमक आहे.</u> मळलेली पायवाट चालण्यापेक्षा नवीन पायवाटेने पुढे गेल्यास स्पर्धाही कमी असते. भविष्याची विलोभनिय स्वप्ने रंगवत करीअर निवडण्यापेक्षा स्वतःच्या स्वभाववैशिष्ठ्याचे भान ठेवून शैक्षणिक पर्याय निवडावा. अन्यथा उत्साहाच्या भरात प्रवेश घेतला जातो, पण त्यामुळे येणारा मानसिक ताण, श्रमही पेलवत नाही. मग अपयश, त्यातून पैसा आणि महत्वाचे वर्ष वाया जाणे, ताणतणाव वाढणे. नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलणे. या दृष्ट चक्रात सापडायला होते. यात आडकायचे नसेल तर सावधान. <u>आजच स्वतःला ओळखा, जसेच्या तसे स्विकारा आणि दमदार पाऊल टाका.</u>

दहावी, बारावी आणि ग्रॅज्युएशन होताच कुठलाही विद्यार्थी करीअरच्या पुढल्या वाटचालीला लागत असतो. काहीजण मेडीकल-इंजिनिअरींगच्या सी.ई.टी.ची तयारी करतात, तर ग्रॅज्युएशन झालेले विद्यार्थी स्पर्धा परीक्षा किंवा इतर पदव्युत्तर अभ्यासक्रमाकडे वळताना दिसतात. दहावी, बारावी किंवा ग्रॅज्युएशन हा आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा आहे यात दुमत नाही. मात्र अशा या टप्प्यावर करीअर निवडताना किंवा निवडल्यावर आपण योग्य ती काळजी घेतो का? स्वतःच्या क्षमतांचा विचार करतो का? गोंधळलेल्या मानसिकतेतून योग्य अभ्यास अथवा किंवा योग्य आयुष्य कधीच उभं राहू शकत नाही. म्हणून खाली दिलेल्या मुद्दयांचा करीअर किंवा एकूणच आयुष्य घडवीत असताना जरूर विचार करावा.

<u>स्वतःची क्षमता ओळखा-</u>

करीअर संदर्भात एकूणच आयुष्य जगत असताना घ्याव्या लागणाऱ्या निर्णयांना स्वतःच्या क्षमतेनेच घासून पहाणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः कुठलाही अभ्यासक्रम निवडताना आपली आवड निवड लक्षात घेतली पाहिजे. स्वतःला हे क्षेत्र किंवा अभ्यासक्रम मला झेपेल का? अशावेळी उत्तराखातर केवळ स्वतःच्या मनाचाच आणि आवडीचाच विचार करून योग्य तो निर्णय घ्या म्हणजे तुमचे आयुष्य बुलंद व्हायला फार उशीर लागणार नाही.

<u>अनुकरण नको -</u>

जीवनात यशस्वी होण्यासाठी मेहनतीची आवश्यकता असते. मात्र यासाठीची कुठलही कृती ही निव्वळ अनुकरण नसावी. लक्षात ठेवा अनुकरणाला मर्यादा पडतात. भव्यदिव्य तिथेच घडू शकते, जीथे स्व-

जाणीवेला आणि स्वर्कृत्वाला वाव असतो त्यामुळे माझा मामे भाऊ, माझा मित्र किंवा माझा शेजारी चालला म्हणून मी सुध्दा त्याच मार्गाला जावे हा विचार पुढे जावून कदाचीत घोडचूक ठरू शकतो. थोडासा निट विचार करा, मागे दृष्टी टाका आणि अनुभव मिळवा. पुढे दृष्टी टाका आणि भविष्य समजावून घ्या, अजुबाजूला दृष्टी फेका आणि सत्य जाणून घ्या. शेवटी स्वत:त दृष्टी टाका आणि त्यातून आत्मविश्वास कमावून घ्या.

लाथ मारीन तिथून पाणी काढीन -

आयुष्य किंवा करीअर बनविताना अगदी वेळ देऊनच निर्णय पक्का करावा. निर्णयास १ महिना उशीर झाला तरी चालेल मात्र त्यामुळे येणारी कित्येक वर्ष वाचतील हे लक्षात घ्यावे. आणि एकदा का निर्णय पक्का केला की मागे वळून बघणे नाही. आव्हानांचा सामना करायला शिका. समस्यासोबत दोन हात करण्याची तयारी ठेवा. कारण अशा आव्हानांचा सामना करताना आपल्यात असलेले सुप्त गुण प्रकट होत असतात. म्हणून किमान हे योग्य गुण कळण्यासाठी आपण स्वत:शी मुकाबला केलाच पाहिजे. या सगळ्या कृतीतून तुमचा आत्मविश्वास बळावेल आणि लाथ मारीन तिथून पाणी काढीन ! ही आशावादी वृत्ती तुमच्यात नवचैतन्याचं वारं घेवून येईल.

श्रध्देला कृतीची जोड द्या -

श्रध्देला कृतीची जोड पाहिजे या आशयाचे बायबलमध्ये एक सुंदर वाक्य आहे. लक्षात ठेवा केवळ श्रध्दा आणि विश्वास असून भागत नाही. अनेकदा आपली वेगवेगळ्या बाबीवर श्रध्दा असते. मात्र तरीही अपयशच हाती लागते. त्याच कारण हे आहे की, कृतीशिल भूमिका आपण पुरेशी वटवत नसतो.

भान ठेवून नियोजन करा -

कुठल्याही प्रयत्नांनी यश गवसत नसेल तर आपल्या मेहनतीवरचा विश्वास कमी व्हायला लागतो. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, योग्य प्रयत्नांनी योग्य यश प्राप्त होत असते. म्हणून जे काही ठरवाल त्या प्रत्येक गोष्टीचे नियोजन करावे. केलेल्या नियोजनाला पुन्हा पुन्हा तपासून घ्यावे. त्यात परिस्थितीनुसार योग्य तो बदल करावा. थोडक्यात भान ठेवून नियोजन करा आणि बेभानपणे ध्येयाचा पाठलाग करा.

करीअर निवडताना घ्यायची काळजी -

पालकांचे पूर्वग्रह त्यानुसार त्यांचे बनत चाललेले दृष्टीकोन यामुळे करीअर निवडताना विद्यार्थ्यांचा अधिकच गोंधळ होतो. पर्यायाने चुकीचे करीअर निवडले जाते. मात्र त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसतो. परिणामी विद्यार्थी नापास होतो. मात्र करीअर निवडताना काही गोष्टी लक्षात घेतल्या तर हे सगळं नक्कीच टाळता येईल.

करीअर निवडताना हे करा-

१) प्रत्येकाची आवड निवड, आकलनशक्ती वेगवेगळी असते. त्यानुसारच विद्यार्थ्यांनी त्यांच करीअर निवडावं.

२) पालकांनी विद्यार्थ्यांसाठी करिअर निवडताना त्यांना कोणत्या विषयात आवड आहे याबाबत त्यांच्याशी चर्चा करूनच योग्य शाखा निवडावं. कारण प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे गुण आणि अवगुण असतात. कोणाला नृत्य आवडतं, कोणाला कॉम्प्युटर तर कोणाला



खेळ. त्यामुळे आवडी निवडी जशा वेगवेगळ्या असतात, त्यानुसार करीअर निवडलं तर विद्यार्थी त्यात चांगलं यश संपादन करू शकतात.

३) करीअर निवडताना विद्यार्थ्याचा जर गोंधळ होत असेल तर त्यांनी आपल्या शिक्षकांचं मार्गदर्शन घ्यावं. कारण विद्यार्थ्याची क्षमता त्यांचा कल ओळखून शिक्षक योग्य मार्गदर्शन करू शकतात.

४) कोणतं करीअर निवडावं याबाबत विद्यार्थी कौन्सिलरकडे जावू शकतात. ॲप्टिट्यूड टेस्ट करून विद्यार्थ्यांना कोणता करीअर पर्याय आपल्यासाठी योग्य ठरू शकतो याची माहिती मिळू शकते.

५) भविष्यात यशस्वी होण्यासाठी योग्य क्षेत्र निवडून त्यातच करीअर करणं खूप महत्वाचं आहे. त्यामुळे करीअर निवडताना सर्व गोष्टींचा विचार करूनच कोणतीही घाई गडबड न करता ते निवडावं.

करीअर निवडताना हे टाळा-

**१) इतरांच्या सांगण्यावरून करीअर निवडने** - खूप वेळा आपल्या मुलांसाठी करीअर निवडताना पालक नातेवाईकांचे, मित्र मंडळींचे सल्ले घेत असतात, त्यानुसारच पाल्यासाठी करीअर निवडतात. माझ्या मुलाने इंजिनीअरिंग केलं होतं आता तो त्यातच छान सेटल झाला आहे, चांगले पैसेही कमवतो अशी वाक्ये इतरांकडून कानावर पडले की, माझा मुलगाही यात करीअर करून चांगला सेटल होवू शकेल अशी पालक समजूत बाळगतात. त्यामुळे पालकांकडून चुकीचे निर्णय घेतले जावू शकतात.

**२) मित्रांच्या सोबतीनुसार करीअरची निवड करणे** - आपलं फ्रेंड सर्कल तुटू नये म्हणून अनेक विद्यार्थी एखाद्या विषयात रस नसतानाही फक्त मित्रांच्या सांगण्यावरून करीअरची निवड करतात.

**३) चुकीचा दृष्टीकोन बाळगुण करीअर निवडणे** - सायन्स आणि कॉमर्सला भरपूर स्कोप आहे, पदवी पर्यंतच शिक्षण पूर्ण झालं की, काहीना काही नोकरी नक्की मिळेल. म्हणून आर्टस् पेक्षा कॉमर्स अथवा सायन्स हेच क्षेत्र आपल्या मुलांनी निवडायला हवं किंवा ओळखीच्या एखाद्या व्यक्तीने त्या क्षेत्रात चांगलं यश मिळवलं म्हणून माझा मुलगाही तसं यश मिळवेल, असा चुकीचा दृष्टीकोन बाळगुण अनेकदा चुकीचं करीअर निवडलं जातं आणि त्याचा फटका विद्यार्थ्याला बसतो. तेंव्हा हे टाळा.

|| सरकारमान्य ||
# दर्पण कॉम्प्युटर्स

**कोरेगांव शाखा Center Code-13210084**
डी.पी.भोसले कॉलेज समोर, कोरेगाव
मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२२१९३९

**रहिमतपूर शाखा Center Code-13210207**
दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर प्रभात टॉकीज शेजारी,
कोरे हाईटस् मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२३०४३०

# आपलं व्यक्तीमत्व जाणून घ्या ....



**यशस्वी माणसे असामान्य गोष्टी करीत नाहीत ती फक्त सर्वसामान्य गोष्टी असामान्यपणे करतात** हे विधान आजच्या प्रत्येक विद्यार्थ्याला अगदी दिपस्तंभासारखे आहे. आपल्या प्रत्येकाला वाटते की जे काही यश- यश, म्हणतात ते असामान्य गोष्टीमधून बाहेर खेचावं लागतं. साध्या लहान सहान गोष्टीकडे दुर्लक्ष केलं तरी चालेल. पण ते तितकसं बरोबर नाही. कोणतीही लहान गोष्ट मग ती एखादा लहानसा व्यवसाय का असेना, विचारपूर्वक, पध्दतशिर आणि योग्य नियोजन केल्यास त्यातून भव्य दिव्य यश मिळू शकतं याची अनेक जीवंत उदाहरणं आपल्याला आपल्या आजूबाजूला पहायला मिळतील.

प्रश्न एकच आहे, हे करायचं कस? यासाठी आपल्याला व्यवसाय निवड याचा टप्प्या टप्प्याने विचार करावा लागेल.

**स्वत:ला ओळखा -**

आपण लहान पणापासून जगाकडे बघायला लागतो. हळूहळू जगाची ओळख आपल्याला व्हायला लागते, पण स्वत:कडे मात्र पहायचे विसरून जातो. म्हणून स्वत:ला सर्वप्रथम प्रश्न विचारा. मी कोण आहे? मी कसा आहे? संपूर्ण मानवी जीवनातील मुलभूत किंवा पायाभूत प्रश्न समजले जातात. अर्थात हे प्रश्न आपण स्वत:ला आधुनिक काळाचा संदर्भ विचारात घेवूनच विचारायचे आहेत. या प्रश्नांची उत्तरे आपण आपल्या नोंदवहित चक्क लिहून ठेवायचे आहेत. मी कोण आहे? या प्रश्नामध्ये माझे नांव, आडनांव, माझी जात, पोटजात, माझ्या आई-वडिलांचा सध्याचा व्यवसाय, त्यांचा समाजातील सामाजिक व आर्थिक दर्जा किंवा स्थान या सगळ्या गोष्टी याव्यात. यानंतर मी कसा आहे? या प्रश्नात माझी शारीरीक क्षमता, बैठ्या किंवा मैदानी खेळामधील नैपुन्य, माझी अभिरूची, माझी अभियोग्यता, माझा कल, माझे छंद, माझ्या सवयी, माझी वृत्ती किंवा स्वभाव, माझ्या अंगी असणारी एखादी विशिष्ठ कला, एखादा विशेष गुण अशा सर्व बाबींचा समावेश करता येईल.

केवळ या दोनच अगदी साध्या प्रश्नांचा योग्य मागोवा घेतल्यास आपलं खरंखुरं वास्तव चित्र आपण कागदावर उभं करू शकतो. आणि या चित्राच्या आधारे आपला व्यवसाय निवडता येतो, जो बऱ्याच अंशी आपल्याला फलदायी ठरतो. असा अनेक व्यवसाय मार्गदर्शनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या तज्ञांचा अनुभव आहे.

करीअर निवडण्यासाठी हाच मुलमंत्र विद्यार्थ्यांना उपयोगी तसेच पालकांना मार्गदर्शक ठरणार हे मात्र नक्की. विद्यार्थी मित्रांनो आपल्या भविष्यातील वाटचालीस आमच्या शुभेच्छा !

**बेस्ट ऑफ लक....**

## विद्यार्थ्यांच्या यशस्वितेसाठी एकच पसंती

# सुर्योदय इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड पॉलिटेक्निक

पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. चित्रलेखाताई माने-कदम यांच्या दुरदृष्टीतून साकारलेल्या व सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात प्रगतीची नवी पहाट निर्माण करणाऱ्या 'सुर्योदय इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड पॉलिटेक्निकच्या' प्रगतीचा हा आलेख....



जेथे पंचक्रोशीचे छात्र तेथे यशस्वीतेची खात्री ..! गेल्या ६० वर्षापासूनची ही परंपरा असणाऱ्या पंचक्रोशी शिक्षण मंडळाने अध्यक्षा सौ. चित्रलेखा माने-कदम यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरु केलेल्या सुर्योदय इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड पॉलिटेक्निकमधील प्रवेश म्हणजे विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याचा उदय असेच म्हणणे समर्पक ठरेल.

दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ३ वर्षांचे मेकॅनिकल इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग, कॉम्प्युटर इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग आणि सिव्हील इंजिनिअरींग हे पाच कोर्सेस या इन्स्टिट्यूटने सुरू केले असून त्यासाठीची प्रवेश प्रक्रियाही सुरु झाली आहे. पंचक्रोशीच्या वेगळेपणामुळे या इन्स्टिट्यूटच्या प्रवेश प्रक्रियेला भरघोस प्रतिसादही लाभत आहे. एआयसीटीईचे मान्यताप्राप्त कोर्सेस सातारा शहरात उपलब्ध करुन देताना संस्थेच्या अध्यक्षा सौ. चित्रलेखाताई माने-कदम यांनी या इन्स्टिट्यूटसाठी निसर्गरम्य परिसर असावा, विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने प्रयत्न केले असून ते यशस्वीही झाले आहेत. सातारा-कोरेगांव मार्गावरील महागावजवळ प्रशस्त शैक्षणिक संकुलात उच्च विद्याविभूषीत, अनुभवी प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक वर्गाच्या व्यवस्थापनाद्वारे राष्ट्रीय नियतकालीकांनी संपन्न ग्रंथालय आणि संदर्भकक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष हे या इन्स्टिट्यूटचे प्रमुख वैशिष्ट्य असून त्याचे रिझल्टही आता सर्वांसमोर येत आहेत.

नोकरीच्या हमीसाठी हवी असलेली क्षमता विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवण्यासाठी आणि स्वयंरोजगारासाठी सक्षमता निर्माण करण्यासाठी हे इन्स्टिट्यूट प्रथमपासूनच प्रयत्नशिल आहे. २४ तास इंटरनेट सुविधा, सहज सुलभ संपर्कासाठी संस्थेची स्वत:ची बससेवा आणि विविध राष्ट्रीय उद्योग-कंपन्यांशी सेवापूर्व प्रशिक्षणासाठी सामंजस्य कराराचे नियोजनही इन्स्टिट्यूट कडून करण्यात आले आहे.

सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन आणि त्याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवण्याचे संस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य इतर शैक्षणिक संस्थांसाठीही नेहमीच आदर्शवत ठरले आहे. कुसुमांजली, सर्वात्मिका सर्वेश्वरा आणि कृषी विज्ञानेश्वरीसारख्या प्रतिभावंत स्मरणिकांचे प्रकाशन, शिवाजी विद्यापीठाचा युथ फेस्टिव्हल, १९९२ पासून सुरू असलेली मातोश्री कुसुमावतीदेवी माने व्याख्यानमाला, कृषिपंढरी सारख्या कृषी मेळावा आणि प्रदर्शनाचे आयोजन, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा ना. शरद पवार यांच्या हस्ते झालेला सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा आणि सर्वात महत्ताकांक्षी ठरलेले संस्थेचे शंभूराजे हे महानाट्य! म्हणजे संस्थेच्या उपक्रमशिलतेमधील मानाची पाने आहेत.

इन्स्टिट्युटमधील मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना संपूर्ण फी सवलत आणि शासकीय नियमानुसार शिष्यवृती देण्याचा निर्णयही संस्थेने घेतला आहे. याशिवाय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी इबीसीची ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. अशाच उच्च दर्जा राखलेल्या या संस्थेच्या सुर्योदय इन्स्टिटूटमधील विद्यार्थ्यांचा प्रवेश म्हणजे पहाट आहे, त्यांच्या यशस्वी आयुष्याची आणि उदय आहे एका नव्या पिढींचा...! थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी एच.एस.सी. (सायन्स) टेक्निकल विषयांसह ५० टक्के मार्क व आयटीआय आणि एमसीव्हीसी उत्तीर्ण ६० टक्के गुणांसह विद्यार्थ्यांना थेट द्वितीय वर्षात प्रवेश देण्यात येणार आहे.

|| सरकारमान्य ||

# दर्पण कॉम्प्युटर्स

**कोरेगांव शाखा** Center Code-13210084

डी.पी.भोसले कॉलेज समोर, कोरेगाव

मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२२१९३९

**रहिमतपूर शाखा** Center Code-13210207

दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर प्रभात टॉकीज शेजारी,

कोरे हाईटस् मोबा. ९८२२०८४१३०, ०२१६३/२३०४३०

# संगणक एक वरदान

**- श्री. भिसे आर. आर., सुभाषनगर, कोरेगांव**



आजचे युग हे संगणकाचे युग आहे, हे सर्वांनी मान्य केले आहे. सध्या संगणकाचे ज्ञान देणाऱ्या अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आपली व संगणकाची ओळख अधिक दृढ झाली आहे. एक संगणक अनेकांची कामे करतो त्यामुळे कमी वेळात खूप कामे उरकली जातात. संगणकाचा सर्वात मोठा गुण म्हणजे अत्यंत अचूक व प्रचंड वेगात काम करण्याची क्षमता. या गुणाचा सर्वत्र उपयोग होत आहे. अगदी गुंतागुंतीच्या गणितापासून ते छपाईपर्यंत सर्व कामे संगणक सहजपणे करू शकतो.

सध्या लहान लहान कार्यालयांपासून ते मोठमोठ्या कंपन्यांपर्यंत सगळीकडे संगणकचा सर्रास वापर केला जात आहे. संगणकात हवी तेवढी माहिती साठवून ठेवता येते आणि हवी ती माहिती क्षणार्धात मिळवता येते. यामुळे कामाच्या प्रत्येक टप्प्यावर पटकन निर्णय घेता येतात. कामे झटपट होतात. साहजिकच वेगाने प्रगती होते.

इंटरनेटमुळे हे विशाल जग अगदी छोटे बनले आहे. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील कोणत्याही व्यक्तीशी क्षणार्धात संपर्क साधता येतो. इंटरनेटवरील माहितीच्या खजिन्यातून कोणत्याही विषयावरील अत्यंत अद्ययावत माहिती मिळते. घरबसल्या नाटक-सिनेमांची किंवा रेल्वे विमानांची तिकिटे आरक्षित करता येतात.

सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळात कोणत्याही क्षेत्रातील स्पर्धेत जिंकायचे असेल तर संगणकाचे ज्ञान आवश्यकच आहे. संगणकाच्या वाढत्या वापरामुळे कितीतरी लोकांना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. संगणकाच्या ज्ञानाचा विकास व त्याचा वापर भारतात मोठ्या प्रमाणात केला जातो. संगणकाबाबत आपण जगात पहिला क्रमांक पटकावला आहे. हा संगणक म्हणजे आपल्याला मिळालेले एक वरदानच आहे.

## दहावी परीक्षा मार्च २०१२ वेळापत्रक

| वार/दिनांक | विषय | वेळ |
|---|---|---|
| गुरुवार दि. १ मार्च २०१२ | मराठी (कुमारभारती) | ११ ते २ |
| शनिवार ३ मार्च २०१२ | हिंदी (लोकभारती) | ११ ते २ |
| | हिंदी (लोकवाणी) | ११ ते १ |
| मंगळवार ६ मार्च २०१२ | इंग्रजी (एलएल) | ११ ते २ |
| शुक्रवार ९ मार्च २०१२ | संस्कृत | ३ ते ५ |
| सोमवार १२ मार्च २०१२ | विज्ञान आणि तंत्रज्ञान | ११ ते १.३० |
| गुरुवार १५ मार्च २०१२ | बीजगणित | ११ ते १.३० |
| सोमवार १९ मार्च २०१२ | भूमिती | ११ ते १.३० |
| बुधवार २१ मार्च २०१२ | इतिहास,नागरिकशास्त्र | ११ ते १.०० |
| शनिवार २४ मार्च २०१२ | भूगोल, अर्थशास्त्र | ११ ते १.०० |

वरील वेळापत्रक एस.एस.सी. बोर्डाच्या संकेतस्थळावरून घेण्यात आले आहे. तथापि शाळेत येणाऱ्या छापील वेळापत्रकावरून विद्यार्थ्यांनी खात्री करून घ्यावी.

संगणक क्षेत्रात करीअर घडविणारं... विद्यार्थ्यांच्या आवडीचं ठिकाण

**दर्पण कॉम्प्युटर एज्युकेशन**

डी.पी. भोसले कॉलेज समोर, कोरेगांव फोन : ०२१६३ - २२१९३९, मो. ९८२२०८४१३०

दर्पण एज्युकेशन सोसायटीचे

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड मान्यताप्राप्त

Center Coad-13210207

**दर्पण कॉम्प्युटर, रहिमतपूर**

मार्च बॅच **MS-CIT**

अंतिम मुदत २८ मार्च

एप्रिल बॅच **MS-CIT**

अंतिम मुदत १५ एप्रिल

MS-CIT कोर्स फी

एक रक्कमी - २८००/-

दोन हप्त्यात १५००+१४००=२९००/-

तीन हप्त्यात १०००+१०००+१०००=३०००/-

कोर्स कालावधी ३ महिने

यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ मान्यताप्राप्त...

दर्पण एज्युकेशन सोसायटीचे...

# दर्पण कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, कोरेगांव (बी.सी.ए.)

**B.C.A.** कालावधी ३ वर्षे
शैक्षणिक पात्रता १२ वी पास

मागासवर्गिय विद्यार्थ्यांना विद्यावेतन (स्कॉलरशिप)

- UGC & DEC मान्यताप्राप्त
- Placement
- Online Examiation
- Internet Free
- No Enterence Exam.

कोरेगांव शाखा ।
डी. पी. भोसले कॉलेज समोर, कोरेगांव
मो. ९८२२०८४१३०, (०२१६३) २२१९३९

रहिमतपूर शाखा ।
प्रभात टॉकीज शेजारी, कोरे हाईटस्, रहिमतपूर.
मो. ९७६५४७२३२६, (०२१६३) २३०४३०





सैन्य व पोलीसदलात भरती होण्यासाठी एक सुवर्णसंधी !

सातारा जिल्ह्यातील परिपूर्ण संस्था

# माजी सैनिक श्रीगुरूदत्त करिअर ॲकॅडमी

डी. पी. भोसले कॉलेज समोर, कोरेगांव, जि. सातारा
मो.९२२६१७६७९८, ८०५५९८४६३९, ९२७२६०४९४१, ९५०३४९७४५८

सैन्य दलात भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र । महाराष्ट्रातील युवक/युवतींना एक नवीन सुवर्णसंधी. देशसेवा व रोजगार अशी दुहेरी संधी म्हणजे माजीसैनिकांनी एकत्रित येऊन श्रीगुरूदत्त करिअर ॲकॅडमी (सैन्य दलात भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र) सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यात डी.पी. भोसले कॉलेजसमोर, कोरेगाव येथे स्थापन करण्यात आली आहे. तरी सैन्य दलात भरती होणाऱ्या इच्छुक नवयुवक / युवतींनी ह्या सुवर्ण संधीचा अवश्य लाभ घ्यावा.



निर्देशक
ले.कर्नल नि.श्री. जयसिंग यादव

फिजिकल डाय.
ले. कर्नल नि. श्री. विष्णू चव्हाण

संस्थापक/अध्यक्ष
श्री. बी. वाय. घोरपडे
(मा. सैनिक)

# एम.के.सी.एल. - अनुभव

## WAVE - World-class Academy for Vocational Excellence



सप्रेम नमस्कार!

आजचा विद्यार्थी स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी एकाच वेळी अनेक शैक्षणिक गोष्टी करीत असतो. आपल्या कॉलेज लाइफमध्ये करियरकरिता उपयोगी ठरणाऱ्या अनेक गोष्टी कॉलेजव्यतिरिक्त उपलब्ध असणाऱ्या वेळामध्ये करण्यासाठी सतत पअयत्नशील असतो. त्यामध्ये कॉम्प्युटर प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्वविकास तसेच व्यावसायिक कोर्सेस अशा अनेक क्षेत्रांकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. कारण बदलत्या काळात नोकरी-व्यवसायातील आव्हानांना सामोरं जाताना आपण बहुआयामी असण्याची गरज निर्माण झाली आहे.

वेव्ह (WAVE - World-class Academy for Vocational Excellence) या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नोकरी करण्यासाठी लागळारी कौशल्यं व क्षमता विकसित करण्यासाठी विविध कोर्सेसची रचना करण्यात आली आहे. कोणत्याही व्यक्तीला वयाच्या कोणतयही टप्प्यावर नवीन शिक्षण सुरू करता यावं यासाठी एम.के.सी.एल. हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामुळे नवं करियर सुरू करण्याची, करियरला नवी दिशा देण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींना तयसाठी पूरक असं शिक्षण घेता येणार आहे. तसंच अनेकांना नोकरीतील कामाचा प्रदीर्घ अनुभव आणि नवं शिक्षण यांची सांगड घालून करियरला नवी दिशा देणंही शक्य होणार आहे.

नवीन नोकऱ्यांच्या शोधात असणारे उमेदवार, तसेच विविध शाखशंमधे करियर करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बँकिंग, एज्युकेशन, इन्शुरन्स, रीटेल अशा कित्येक क्षेत्रांत रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. आज व्यावसायिक क्षेत्रांमध्ये नोकरीस येणाऱ्या प्रत्येक उमेदवारास पदवीबरोबरच इतर व्यावसायिक कौशल्यांचीही विचारणा केली जाते. ज्या उमेदवारास अभ्यासक्रमाव्यतिरिक्त नोकरीसंबंधी इतर कौशल्य आत्मसात आहेत अशा उमेदवारास प्राधान्य दिलं जातं. सर्वसाधारणपणे कोणत्याही व्यावसायिक अभ्यासक्रमात नोकरीसाठी आवश्यक त्या कौशल्यांचा अंतर्भाव केला जातो. पण बहुतांश अभ्यासकअम शहरी भागात शिकविले जातात व त्यांचा कालावधी एक ते दोन वर्षांचा असतो, आणि म्हणूनच त्यासाठीचं प्रशिक्षण शुल्कही अधिक असल्याचं दिसतं. त्यामुळेच शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एम.के.सी.एल.तर्फे वेव्ह अंतर्गत अनेक नवे जॉब ओरिएंटेड डिप्लोमा कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. छोट्या कालावधीच्या, सर्वत्र उपलब्ध असणाऱ्या व अत्यांत माफक शुल्क असलेल्या या कोर्सेसमुळे कॉलेजपासून करियरपर्यंतच्या प्रवासामध्येच विद्यार्थी आपले व्यावसायिक शिक्षण सहज पूर्ण करू शकणार आहेत.

करियर म्हणून उत्तम पर्याय असणारे हे कोर्सेस डिजिटल आर्टस्, ग्राफिक्स आणि ॲनिमेशन, मॅनेजमेंङट, फायनान्शियल अकौटिंग (ईआरपी), हार्डवेअर, नेटवर्किंग सिस्टीम, ॲडमिनिस्ट्रेशन आणि सिक्युरिटी अशा विविध विभागांमध्ये उपलब्ध आहेत. आयटी फॉर टिचर्स या विशेष कोर्सची रचना खास शिक्षकांसाठी करण्यात आली आहे. प्रत्यक्ष काम करताना कोणत्या गोष्टींचा विचार करायला हवा, याचा विचार करून या कोर्सेसचा अभ्यासक्रम निश्चित केला गेला आहे. उदा. कस्टमर सर्व्हिस या कोर्सअंतर्गत ग्राहकांचे प्रकार, ग्राहकसेवा म्हणजेच विपणन, ग्राहकांच्या गरजांचे व्यवस्थापन, ऑफर कशा द्याव्यात, सुहास्य ङिटकवून देवाण-घेवाण कशी करावी असे विषय शिकवले जातात. दीड ते तीन महिन्यांच्या या कोर्सेसमध्ये ई-लर्निंग, केस स्टडीज, प्रोजेक्ट्स व प्रॅक्टिकल्सच्या माध्यमातून प्रशिक्षण दिलं जातं. हे डिप्लोमा कोर्सेस महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील एम.के.सी.एल.च्या अधिकृत सेंटर्समध्ये उपलब्ध आहेत. त्यासाठी कोर्स कालावधीप्रमाणे रु. १५००/- ते रु. ३०००/- दरम्यान फी आकारली जाते.

विद्यार्थ्यांना कॉलेजपासून करियरपर्यंतच्या प्रवासामध्ये हे कोर्सेस करता यावेत, तसेच नोकरी करणाऱ्यांना व व्यावसायिकांनाही बदलत्या काळानुरूप ज्ञान वृद्धिंगत करता यावे, या हेतूनेच वेव्ह कोर्सेसची रचना करण्यात आली आहे.

# दर्पणचा 'ट्रॅडिशनल डे'

## विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देणारा एक अनोखा सोहळा



'दर्पणच्या' विद्यार्थ्यांनी पारंपारीक वेशभुषा परिधान करून काढलेली भव्य मिरवणूक.



शाही मिरवणूकीत छत्रपती शिवाजी महाराज व बाल संभाजी महाराजांसमवेत सहभागी झालेले विद्यार्थी.



ट्रॅडिशनल डे मध्ये ढाल, तलवार घेतलेल्या रणरागिनी मिरवणूकीच्या अग्रभागी होत्या.



ट्रॅडिशनल डे रॅलीत रंगेबिरंगी साड्या परिधान केलेल्या विद्यार्थीनी.



ट्रॅडिशनल डे रॅलीत विद्यार्थ्यांनी असा उत्स्फूर्त सहभाग घेतला.



१०० पैकी १०० गुण मिळवणाऱ्या सचिन महाडीक मध्वापूरवाडी (किन्हई) याचा सत्कार करताना प्रा. डॉ. के. एम. नलवडे

## 'दर्पण' कॉलेजचे सुसज्ज शैक्षणीक संकुल



'दर्पणच्या' कॉम्प्युटर लॅबच्या बाहेरील भव्य परिसर



'दर्पणच्या' कॉम्प्युटर लॅबच्या बाहेरील भव्य परिसर



'दर्पणच्या' कॉम्प्युटर लॅबमध्ये एकाचवेळी असे असंख्य विद्यार्थी प्रॅक्टीस करताना



सेमिनार देताना विद्यार्थी



'ट्रॅडिशनल डे' मध्ये उत्कृष्ट वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषीक देताना बर्गे मॅडम



'ट्रॅडिशनल डे' मध्ये उत्कृष्ट वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थीनीस पारितोषीक देताना अनिता मॅडम

SURYODAYA
INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY

''ज्ञानम्, बलम, शीलम, लालित्यादिनाम् संवर्धनम्''
शाश्वत व आश्वासक ध्येय पथावर मार्गस्थ होण्यासाठी
पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे

approved by
A.I.C.T.E. D.T.E. & Goverment of Maharashtra
Affiliated to M.S.B.T.E.



चित्रलेखा माने-कदम
(अध्यक्षा पंचक्रोशी शिक्षण मंडळ.)

# सुर्योदय इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड पॉलिटेक्निक, सातारा (महागांव)





क्लासरुम



कॉम्प्युटर लॅब



वर्कशॉप



ड्रॉइंग हॉल

## डिप्लोमा कोर्सेस

| | | | |
|---|---|---|---|
| मेकॅनिकल इंजिनिअरींग | 120 | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | 60 |
| इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरींग | 60 | इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग | 60 |
| | | सिव्हील इंजिनिअरींग | 60 |

### शिष्यवृत्ती

SC, ST, NT, OBC, SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना संपूर्ण फी सवलत व शिष्यवृत्ती सरकारी नियमाप्रमाणे मिळेल.
आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी (EBC) फी सवलत

### प्रवेश पात्रता

दहावी अर्थात शालांत प्रमाणपत्र परीक्षा पास.

### थेट दुस-या वर्षासाठी प्रवेश

M.C.V.C. किंवा इ. १२ वी शास्त्र (तांत्रिक विषयांसह) उत्तीर्ण थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश.

संपर्कासाठी : 02162-203289, 203290

Mob. 9604362030, 9657075277. Email - suryodayasatara@gmail.com